* अमरावती *

* वर्ष ५१ * अंक १९१ *

मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६

किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-

एकूण किंमत रु. ३/-

पाने ८

Website : www.dainikmahasagar.in


Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com





नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com


## इंदूरमध्ये मृत्यूचे सत्र सुरूच, २२ वा बळी

■ वृत्तसंस्था, इंदूर, दि. १२ :
इंदूरमध्ये दूषित पाणी प्यायल्याने २२वा मृत्यू झाला आहे. मृतकाची ओळख कमलाबाई, पती तुळशीराम (५९) अशी झाली आहे.
तिला ५-६ जानेवारीपासून उलट्या आणि जुलाबाची तक्रार होती. प्रकृती बिघडल्याने ७ जानेवारी रोजी तिला एमवाय रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मृत्यूनंतर नातेवाइकांनी भागीरथपुरा येथील महानगरपालिकेच्या पथकाला आणि संबंधित केंद्राला याची माहिती दिली, परंतु आधार कार्ड जीवन की फेल येथील असल्याने या प्रकरणाची दूषित पाण्यामुळे झालेला मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली नाही. दुषित पाण्यामुळे येथे यापूर्वी अनेकांना जीव गमवावा लागला आहे.


* वर्ष ५१ * अंक १९१ * * अमरावती * मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


# न भयम्.. न लज्जा




आज आपल्या महाराष्ट्रातील महानगरपालिकांचा महाप्रचार सायंकाळी थांबणार आहे. यानंतर महाराष्ट्रातील महानगर पालिकांमध्ये काय होते याचा विचार पुढे करू. पण नुकत्याच संपन्न झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपालिकांच्या निवडणुकीनंतर जे काही राजकारण सुरू आहे ते पाहिल्यावर आपला महाराष्ट्र कुठे चालला आहे हेच समजत नाही. सत्तेसाठी किंवा वैयक्तिक मानापमानासाठी आपला पक्ष आणि पक्षाची ध्येयधोरणे व विचार खुंटीवर टांगण्याचे कार्य आपले निवडून आलेले नगरसेवक किती भंपकपणे करीत आहेत, हे पाहिल्यावर आपली मान लज्जेने खाली जाते. राज्यात भारतीय जनता पक्ष, शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या तीन इंजिनांच्या महायुतीचे सरकार आहे. तिन्ही पक्षांची अतिशय वेगवेगळी धोरणे आहेत पण अनेक ठिकाणी या युतीपेक्षा विरोधी पक्षांबरोबरची आघाडी जास्त फायदेशीर ठरलेली दिसून येत आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट मध्ये तर एमआयएम बरोबर भारतीय जनता पक्षाच्या तेथील लोकांची युती झालेली आहे. अंबरनाथ येथील नगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचे सैनिक आणि शिंदे सेनेचे सैनिक एकमेकांविरुद्ध तलवारीच काढीत आहेत. येथे अंबरनाथ मध्ये शिंदे यांचा शिवसेना अर्थात मोठा पक्ष आहे. पण भारतीय जनता पक्षाने काँग्रेस बरोबर युती केली. त्यामुळे काँग्रेसच्या उच्च पदस्थांनी त्यांच्या पक्षातील बारा लोकांना आधी प्रश्न विचारला आणि नंतर निलंबित केले आणि मग याच 12 लोकांनी पक्ष निष्ठेचे 12 वाजवून 12 च्या भावात जाऊन स्वतःला विकून टाकले. तेव्हा भारतीय जनता पक्ष विजयोत्सव साजरा करीत होता. मात्र त्यानंतर शिंदे यांच्या शिवसेनेने अजब वाटणारी खेळी करून गजब उडवून दिलेला आहे. निवडून आलेल्या उमेदवारांच्या जादुई आकड्यामुळे उपनगराध्यक्षपदी शिंदे सेनेचा पुरस्कृत उपनगराध्यक्ष झालेला आहे. यामुळेच कोणाचाच कोणाला ताळमेळ नाही, असे परस्परविरोधी चित्र दिसून येत आहे. कोणे एकेकाळी हरियाणामध्ये आयाराम - गयाराम होण्याच्या घटना घडत असत. तेव्हा आपण सर्व त्यांच्या निष्ठेबद्दल त्यांना दूषणे देत होतो, आता तोच प्रकार सर्रासपणे महाराष्ट्रात सुरू आहे. आजकाल जशा नोकऱ्या टिकाऊ नसतात किंवा नोकऱ्या टिकवण्याची नोकरी करणाऱ्यांना गरज वाटत नाही. म्हणजेच आज एका कंपनीत तर उद्या दुसऱ्या कंपनीत अशी फिरवाफिरवी चालू असते. कंपनी असल्यामुळे तेथे निदान पगार तरी वाढतात. त्यामुळे त्या ठिकाणी विचारसरणीची आणि ध्येय धोरणे यांची गरज नसते. इथे राजकारणात पक्ष-ासोबत ध्येयधोरणे, विचारसरणी आणि उद्दिष्टे असतात. नेमकी तिथेच 'सत्तातुराणां न भयम्.. न लज्जा' अशी भयानक परिस्थिती आलेली आहे कारण, अगदी कालपर्यंत असलेला पक्का निष्ठावंत असा काही निसटून जातो की तो कसा निसटून जातो हे काही कळत नाही. ही नव्या प्रकारच्या राजकारणाची नांदी आहे काय हे आम्हाला माहीत नाही. तरीही महाराष्ट्रातील अशा प्रकारचे नवे राजकारण यापुढे कोणत्या थराला जाईल. याचा अंदाज करणारा निश्चितच पराभूत होईल, अशी स्थिती आलेली आहे.


mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023


# झेडपी निवडणुकीला मुदतवाढ

## १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणूक घ्या : सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**
राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे.

या निवडणुका पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे निवडणुकांच्या घोषणेची प्रतीक्षा करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना आता आणखी काही दिवस वाट पाहावी लागेल.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रशासकीय अडचणी आणि प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ हवा असल्याने आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मागितली होती. आज या अर्जावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली.

सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाची विनंती मान्य केली आहे. राज्य निवडणूक आयोगाला जिल्हा परिषद निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ज्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेली नाही, त्या निवडणुका तुम्ही पूर्ण करा, असे कोर्टाकडून सांगण्यात आले.

**आरक्षणाचा पेच आणि नवीन याचिका**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचा मुद्दा कळीचा ठरला आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्या येथे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असल्याने त्यांच्या निवडणुका घेण्यास तांत्रिक अडचण नाही.

२० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली असल्याने त्यांच्या निवडणुकांवर प्रश्नचिन्ह आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून एक नवीन याचिका दाखल करण्यात आली आहे. "नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही न्यायालयीन निकालाच्या अधीन राहून एकाच वेळी घेण्यात याव्यात," अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

**एकत्रित की टप्प्याटप्प्याने? पेच**

सध्या राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा धुराळा उडालेला आहे. या निवडणुका संपण्यापूर्वीच जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर होतील, असा अंदाज वर्तवला जात होता.

मात्र, आता १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत मिळाल्यामुळे जिल्हा परिषद निवडणुका काहीशा लांबणीवर पडल्या आहेत. आता राज्य निवडणूक आयोग केवळ आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक घेते की सर्वच जिल्ह्यांचा पेच सुटेपर्यंत थांबते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अमेरिकेचे राजदूत म्हणतात... भारतापेक्षा महत्त्वाचा कोणताही देश नाही

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :**
भारतात अमेरिकेचे नवे राजदूत सर्जियो गोर यांनी सोमवारी नवी दिल्लीत पदभार स्वीकारला. यावेळी ते म्हणाले की, अमेरिकेसाठी भारतापेक्षा महत्त्वाचा दुसरा कोणताही देश नाही. गोर यांनी सांगितले की, दोन्ही देशांमध्ये व्यापार कराराबाबत फोनवर चर्चा होणार आहे.



अमेरिकेच्या राजदूतांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांच्या मैत्रीला खरी म्हटले. ते म्हणाले की, खरे मित्र असहमत होऊ शकतात, परंतु शेवटी ते नेहमीच आपले मतभेद मिटवतात. आपल्या पहिल्या भाषणाची सुरुवात गोर यांनी नमस्तेने केली. भारतात अमेरिकेचे राजदूत असणे अभिमानाची गोष्ट आहे म्हणत त्यांनी भारताला एक असाधारण राष्ट्र म्हटले.

## निवडणूक आयोगाचा महायुती सरकारला दणका
## लाडक्या बहीणींना आगाऊ रक्कम देण्यास मज्जाव

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :**
महापालिका निवडणुकीच्या मतदानाच्या २४ तास अगोदर ह्यमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणह्व योजनेचा आगाऊ हप्ता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे महायुती सरकारचे मनसुबे राज्य निवडणूक आयोगाने उधळून लावले.

जानेवारी २०२६ या महिन्याचा १,५०० रुपयांचा आगाऊ हप्ता मकर संक्रांतीपूर्वी लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्याची सरकारची योजना होती. मात्र, जानेवारी महिन्याची अशी आगाऊ रक्कम जमा करण्यास निवडणूक आयोगाने मनाई केली आहे. मात्र ही चालू योजना असल्याने डिसेंबर २०२५ या महिन्याचा हप्ता देण्यास परवानगी दिली आहे.

भाजप मंत्री गिरीश महाजन यांनी एक्सवरील पोस्टमध्ये मकर संक्रांतीपूर्वी डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ या दोन महिन्यांचे मिळून तीन हजार रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होणार असल्याचे जाहीर केल्यानंतर हा वाद निर्माण झाला होता.

याबाबत निवडणूक आयोगाने मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याकडून अहवाल मागवला होता. मुख्य सचिवांनी दिलेल्या अहवालात ह्यलाडकी बहीणह्व योजना ही संजय गांधी निराधार योजनेसारखी सातत्याने सुरू असलेली योजना असल्याचे नमूद करत, आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नसल्याचे स्पष्ट केले.

मात्र, डिसेंबर २०२५ची रक्कम देता येईल. परंतु निवडणूक प्रक्रियेदरम्यान जानेवारी महिन्याची आगाऊ रक्कम देणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका आयोगाने घेतली आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस संदेश कोंडविलकर यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. त्याची दखल आयोगाने घेतली.




# अरावली संकटात विकासाच्या नावाखाली वाळवंटीकरणाला मोकळा रस्ता?

सर्वोच्च न्यायालयाने अरावली पर्वतरांगांची व्याख्या आणि त्यासंबंधीच्या पूरक मुद्द्यांवर नुकतेच स्वतःहून दखल घेतली आहे. याअंतर्गत न्यायालयाने 20 नोव्हेंबर रोजी दिलेल्या, अरावली पर्वतरांगांची नवी व्याख्या स्वीकारणाऱ्या आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, मागील निर्णयात नमूद केलेले निष्कर्ष आणि निर्देश सध्या स्थगित ठेवणे आवश्यक आहे, कारण काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर अधिक स्पष्टता आवश्यक आहे.

-----------------

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने या संपूर्ण विषयाची सखोल, व्यापक आणि सर्वंकष समीक्षा करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेली उच्चस्तरीय समिती गठित करण्याचे संकेत दिले आहेत.

न्यायालयासमोर मुख्य प्रश्न असा आहे की, अरावली पर्वतरांगांची नवी व्याख्या जी विशेषतः दोन किंवा अधिक 100 मीटर उंचीच्या टेकड्यांमधील केवळ 500 मीटर अंतरापुरती मर्यादित आहे ही रचनात्मक विसंगती निर्माण करते का? या व्याख्येमुळे संरक्षित क्षेत्राचा भौगोलिक विस्तार संकुचित होऊन, अरावलीचा मोठा भाग संरक्षणाबाहेर जात आहे का, हा मूलभूत मुद्दा आहे.

या सीमांकनामुळे गैर-अरावली क्षेत्राचा व्याप वाढतो आणि परिणामी अनियमित खनन, रिअल इस्टेट प्रकल्प व इतर पर्यावरणविघातक उपक्रमांना मोकळीक मिळते, अशी गंभीर भीती व्यक्त केली जात आहे. ¬

यायालय हेही तपासत आहे की, 100 मीटर किंवा त्याहून अधिक उंचीच्या टेकड्या, जरी त्या 500 मीटरच्या मर्यादेपेक्षा अधिक अंतरावर असल्या, तरी त्या एकसंध पारिस्थितिकीय रचना तयार करत नाहीत काय?

राजस्थानमधील एकूण 12,081 टेकड्यांपैकी केवळ 1,048 टेकड्याच 100 मीटर उंचीचा निकष पूर्ण करतात, अशी मोठ्या प्रमाणावर प्रसारित झालेली टीका तथ्यात्मक आणि वैज्ञानिकदृष्ट्या योग्य आहे का, हाही प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे.

पूर्वार्ध
विकास परसराम मेश्राम
मु+पो, झरपडा,ता, अर्जूनी/मोर
जिल्हा गोंदिया.
7875592800
vikasmeshram04@gmail.com

यामुळे उर्वरित बहुसंख्य टेकड्या पर्यावरणीय संरक्षणापासून वंचित राहत असल्याचा आरोप आहे.

न्यायालयाचे असेही मत आहे की, पर्यावरण कार्यकर्त्यांनी नव्या व्याख्येचा आणि न्यायालयाच्या आधीच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावला जाण्याची आणि गैरवापर होण्याची शक्यता व्यक्त करत चिंता व्यक्त केली आहे. ही चिंता, टीका किंवा असहमती न्यायालयाच्या निर्देशांमधील स्पष्टतेच्या अभावातून निर्माण झालेली आहे. त्यामुळे अरावली क्षेत्राच्या पारिस्थितिक अखंडतेला कमजोर करणारी कोणतीही नियामक पोकळी राहू नये, यासाठी सखोल चौकशी व स्पष्टता अत्यंत आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा ताजा आदेश स्वागतार्ह मानला जात आहे. पुढे काय होईल, हे जरी स्पष्ट नसले, तरी 20 नोव्हेंबरच्या आदेशामुळे निर्माण झालेल्या असंतोषाला आणि विरोधाच्या आवाजांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

खरं तर, देशभरातील पर्यावरण कार्यकर्त्यांनी या नव्या व्याख्येला तीव्र विरोध केला होता. त्यांच्या मते, ही व्याख्या अरावली पर्वतरांगांमध्ये खनन, रिअल इस्टेट आणि इतर मोठ्या प्रकल्पांसाठी मार्ग मोकळा करून, अरावलीला हानी पोहोचवण्यासाठी आखलेली सुनियोजित योजना आहे. अरावली भागात खनन वाढवण्याची मानसिकता भविष्यासाठी अत्यंत घातक असल्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

20 नोव्हेंबरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात विशेषतः अरावली क्षेत्रातील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आंदोलनं झाली. ठिकठिकाणी मोर्चे, रॅल्या काढण्यात आल्या. या आंदोलनांमध्ये सामान्य नागरिकांबरोबरच राजकीय पक्ष, शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आजही सेव्ह अरावली मोहिम जोमाने सुरू आहे. या आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, उत्तर ते पश्चिम भारतापर्यंत पसरलेल्या अरावली पर्वतरांगांना तोडणे म्हणजे भारताच्या वारशालाच सुरुंग लावण्यासारखे आहे.

अरावली ढासळली, तर केवळ डोंगरच नाही तर पाणी, शेती, हवा आणि येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य धोक्यात येईल. हे विकासाचे लक्षण नाही, तर एक इशारा आहे – वेळेत सावरलो नाही, तर उशीर होईल.

मुळात अरावलीविषयी माजलेला गदारोळ तिच्या अस्तित्वाशी निगडित आहे. कारण अरावली ही केवळ भूगोलातील एक धडा नाही, ती दगडांचा ढीग नाही, चट्टानांची रांग नाही. मरुभूमीतील संपूर्ण जीवन तिच्यावर अवलंबून आहे. ती थार वाळवंटाचा विस्तार पूर्वेकडे रोखणारी नैसर्गिक ढाल आहे.

सुमारे 670 किलोमीटरपर्यंत पसरलेली ही पर्वतरांग उत्तर भारतासाठी एक संरक्षण कवच आहे. हजारो वर्षांपासून ती वाळवंटाच्या वाळूला पुढे सरकण्यापासून रोखते, भूजल साठवते, धुळीच्या वादळांपासून आणि प्रदूषणापासून शहरांचे संरक्षण करते. येथे 300 हून अधिक पक्षीप्रजातींसह बिबटे यांसारखे वन्यजीवही आढळतात.

अरावली पर्वतरांगा कोट्यवधी वर्षांपूर्वी टेक्टॉनिक प्लेट्सच्या हालचालींमुळे निर्माण झाल्या. लाखो वर्षांच्या अपक्षयामुळे त्या आज उंच-नीच टेकड्यांच्या स्वरूपात दिसतात. त्यांची उंची साधारणतः 300 ते 900 मीटरपर्यंत आहे, तर माउंट आबू येथील गुरु शिखर 1,722 मीटर उंच आहे.

2024 मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने अरावलीसाठी एकसमान व्याख्या ठरवण्यासाठी तांत्रिक समिती स्थापन केली.

राजस्थानातील स्थानिक तलावर आधारित 100 मीटर उंची ही व्याख्या स्वीकारण्यात आली. या व्याख्येनुसार, 100 मीटर उंची असलेली टेकडी किंवा दोन अशा टेकड्यांमधील 500 मीटर परिसर अरावलीचा भाग मानण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने 20 नोव्हेंबर 2025 रोजी ही व्याख्या मान्य केली आणि याच निर्णयाला तीव्र विरोध झाला.

-----------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## विवेकानंदांचा संदेश

विवेक शक्ति जागृत झाली
केला नरेंद्राने निर्धार
तरुणाईच्या जागृतीविना
नाही जगाचा उध्दार..!

काळ चालला पुढे पुढे
तरुणाई भोगात रममाण
त्यागाचा संदेश देऊनी
केले चैतन्य निर्माण..!

दानवतेचा करूनी त्याग
मानवता अंगी बाणवा
यशोशिखर गाठण्या
सुदृढ शरीर तुम्ही कमवा..

# शिक्षक शांत झाला आणि पिढी बेशिस्त झाली..

एकेकाळी शिक्षक म्हणजे केवळ ज्ञान देणारा नव्हता, तर तो मूल्यांचा प्रहरी होता. वर्गाबाहेरही त्याची भीती नव्हे, तर आदर होता.

शिक्षक दिसताच मुलांच्या पावलांना आपोआप शिस्त लागायची, शब्दांना मर्यादा यायची आणि वागण्यात संयम उतरायचा. आज मात्र चित्र उलटं आहे. शिक्षक पाहताच वळण घेणारी पिढी ही केवळ शिस्तभंगाची नव्हे, तर सामाजिक अधःपतनाची स्पष्ट खूण आहे.

आजचा काळ अधिकार या शब्दाभोवती फिरतो. अधिकार हवेत, पण कर्तव्यांची जाणीव नाही. शिक्षकाला प्रश्न विचारणे नव्हे, तर त्याच्यावर प्रश्नचिन्ह उभं करणं हेच जणू आधुनिकतेचं लक्षण मानलं जातं.

शिस्त म्हणजे बंधन, संस्कार म्हणजे जुनाटपणा आणि आदर म्हणजे कमजोरी–अशी घातक समीकरणं समाजमनात खोलवर रुजत चालली आहेत. याला जबाबदार कोण?

केवळ मुले नाहीत. पालक, व्यवस्था आणि समाज–सर्वांनी मिळून शिक्षकाच्या अधिकाराची धार बोथट केली आहे. ‘मुलांना त्रास झाला’ या एका वाक्यावर शिक्षक चौकशीच्या फेऱ्यात अडकतो, पण मुलं चुकीच्या वाटेवर जात आहेत याकडे डोळेझाक होते. शिक्षकाला अधिकार नसेल, तर तो दिशा कशी देणार? आणि दिशा नसेल, तर पिढी कुठे जाणार?

व्यसनं, हिंसा, मोबाईलचं व्यसन, तात्काळ समाधानाची सवय–हे सगळं आजच्या पिढीचं वास्तव आहे. या वास्तवावर औषध देण्याची ताकद शिक्षकाकडे असते, पण त्याचे हात बांधलेले असतील तर तो उपचार कसा करणार?

शिक्षक म्हणजे शत्रू नाही; तो भविष्यातील समाज घडवणारा शिल्पकार आहे, हे आपण विसरत चाललो आहोत. आज गरज आहे ती शिक्षकाला पुन्हा अधिकार देण्याची–अंधसत्तेचे नव्हे, तर जबाबदारीने वापरता येतील असे अधिकार. शिस्त म्हणजे शिक्षा नव्हे, तर संस्कारांची पायाभरणी आहे, हे पुन्हा समाजमनावर बिंबवण्याची वेळ आली आहे.



प्रमोद जांभूळकर
नागपूर.
9823969097

शिक्षक पाहताच वळण घेणारी पिढी नको, तर शिक्षक पाहताच मान ताठ करणारी, डोळ्यांत आत्मविश्वास असणारी पिढी घडवायची असेल, तर शिक्षकाचा सन्मान हा केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतून दिसला पाहिजे. कारण शिक्षक कमजोर झाला, तर संपूर्ण पिढी दिशाहीन होते–आणि दिशाहीन पिढी ही कोणत्याही समाजासाठी सर्वात मोठी आपत्ती असते.

■ ■ ■

# हिंदुस्तान एरोनॉटिक्समध्ये मुख्य चाचणी पायलट राकेश शर्मा!

(१३ जानेवारी : राकेश शर्मा जन्म दिन- वाढदिवस विशेष.)

-----------------

राकेश शर्मा हे अंतरिक्षात जाणारे पहिले भारतीय आहेत. भारताचा पहिला आणि जगाचा १३८वा अंतराळवीर बनण्याचा सन्मान विंग कमांडर राकेश शर्मा यांनी पटकावला, तो दि.२ एप्रिल १९८४ रोजी. भारत-रशिया अवकाश संशोधन मंडळ कार्यक्रमांतर्गत रशियाच्या सोयूझ टी-११ यानातून दोन रशियन अंतराळ संशोधकासमवेत राकेश शर्मा यांनी अवकाश सफरीचा अनुभव घेऊन या क्षेत्रात प्रगतीचे नवे दालन भारतीयांसाठी खुले केले.

-----------------

राकेश शर्मा यांचा जन्म दि.१३ जानेवारी १९४९ रोजी पटियाला, पंजाब राज्य, भारत येथे झाला. एक भारतीय लष्करी वैमानिक आणि अंतराळवीर, अंतराळातील पहिले भारतीय नागरिक आहेत. सन १९७०मध्ये शर्मा भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून रुजू झाले.

सन १९७१च्या बांगलादेश युद्धात त्यांनी मिग- २१मध्ये २१ लढाऊ मोहिमा उडवल्या. सन १९८२मध्ये त्यांची सोव्हिएत-भारतीय संयुक्त अवकाशयानासाठी अंतराळवीर म्हणून निवड झाली. दि.३ एप्रिल १९८४ रोजी त्यांनी दोन सोव्हिएत अंतराळवीर, कमांडर युरी मालीशेव्ह आणि फ्लाइट इंजिनियर गेनाडी स्ट्रेकालोव्ह यांच्यासोबत सोयुझ टी- ११वर उड्डाण केले, ते अंतराळ स्थानक सॅल्युट ७वर गेले. तेथे शर्मा यांनी अंतराळातून भारताचे छायाचित्रण आणि अभ्यासासाठी व्यायामाचा समावेश असलेले प्रयोग केले.



वजनहीनतेच्या वेळी योगाचे शरीरावर होणारे परिणाम हे मिशन जवळपास आठ दिवस चालले आणि शर्मा आणि त्यांचे क्रू सोबती ११ एप्रिल रोजी कझाकस्तानमध्ये दाखल झाले. सन १९८७मध्ये ते भारतीय कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्समध्ये मुख्य चाचणी पायलट म्हणून रुजू झाले. सन २००१मध्ये त्यांनी हिंदुस्थान एरोनॉटिक्स सोडले आणि बंगलोर- बेंगळुरू येथील प्रक्रिया - व्यवस्थापन कंपनी, ऑटोमेटेड वर्कफ्लोच्या बोडार्चे अध्यक्ष झाले.

राकेश शर्मा पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी अंतराळातून बोलत होते. "अंतराळातून भारत कसा दिसतो?" या प्रश्नाला त्यांनी "सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा" असे अभिमानी उत्तर दिले होते. पतियाळात जन्मलेले राकेश भारतीय वायू दलात वैमानिक होते. नंतरच्या काळात त्यांचा अशोक चक्र देऊन सन्मान केला गेला.

राकेश शर्मा हे भारतीय एअर फोर्समध्ये विंग कमांडर होते. वयाची २३ वर्षे पूर्ण करण्यापूर्वीच त्यांनी मिग- २१ या फायटर जेटमधून २१ वेळा उड्डाण केले होते. भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा यांचा आज वाढदिवस आहे.

दि.१३ जानेवारी १९४९ रोजी पटियालामध्ये त्यांचा जन्म झाला होता. दि.३ एप्रिल १९८४ रोजी अंतराळात पोहोचणारे पहिले भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला होता. सुमारे आठ दिवस ते अंतराळात राहिले होते. सन १९८२ साली त्यांची अंतराळ यात्रेसाठी निवड झाली. इस्त्रो आणि सोव्हिएत संघ यांच्या संयुक्त मोहिमेंतर्गत सोयूज टी-११ या यानातून ते अंतराळात गेले होते.

सारे जहाँ से अच्छा.., सोयूज टी-११ मधील क्रूसोबत एका जॉइंट कॉन्फरन्समध्ये भारताने पहिल्यांदाच अंतराळातील आपल्या नागरिकासोबत गप्पा मारल्या होत्या. यावेळी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारलं होतं, की अंतराळातून भारत कसा दिसतोय? यावेळी उत्तर देताना राकेश शर्मा हिंदीतून म्हणाले होते, "सारे जहाँ से अच्छा..!"

पुढचं वर्षही गाजवणार 'इस्त्रो'; पहिल्या दिवसापासूनच होणार मोहिमांची सुरुवात! राकेश शर्मांनी एका मुलाखतीमध्ये सांगितलं होतं, की सोयूज यानाच्या प्रक्षेपणाच्या दिवशी त्यांना अगदीच 'बोरिंग' वाटत होतं. या क्षणाचा सराव त्यांनी बऱ्याच वेळा केला होता. त्यामुळे त्या दिवशीही अगदी रुटीन असल्याप्रमाणेच सगळं पार पडलं, असं ते सांगतात.

राकेश शर्मा हे सध्या कुन्नूर नावाच्या एका छोट्या गावात आपल्या पत्नीसोबत राहतात. प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर अगदी साधं आयुष्य ते जगत आहेत. अर्थात, ते अंतराळ मोहिमांपासून नक्कीच दूर झाले नाहीत.

ते सध्या इस्त्रोच्या गगनयान मोहिमेसाठी सल्लागार म्हणून मदत करत आहेत. गगनयान मोहिमेच्या माध्यमातून भारत पहिल्यांदाच स्वतः स्पेसमध्ये अंतराळवीर पाठवणार आहे, हे विशेष! अंतराळवीर राकेश शर्मा यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

■ ■ ■



कृष्णकुमार आनंदी-
गोविंदा निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड
गडचिरोली.
९४२३७१४८८३

# ग्रामीण आरोग्य चळवळीच्या प्रणेत्या

ग्रामीण भागात तालुका म्हणून ओळख मिरवणारी अनेक शहरे कधी जिल्ह्याइतकी मोठी झाली, हे कळलेच नाही. शहरांमध्ये माणसं वाढली; मात्र जमिनी आणि तालुका नावाचा शिक्का तसाच कायम राहिला. परिणामी प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा पुरवणे आणि त्यांच्या गरजा पूर्ण करणे हे कुठल्याही शासनाला सहज शक्य झाले नाही. महाराष्ट्रात आज अशी चाळीसहून अधिक शहरे आहेत, ज्यांनी तालुक्याच्या चौकटीतून बाहेर पडत जिल्ह्यासारखे स्वरूप धारण केले आहे. त्यातच आंध्र सीमेलगतचे धर्माबाद हे शहर येते.

धर्माबादमध्ये सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी डॉ. मीना जोशी (पूर्वाश्रमीच्या मीना देशपांडे) यांनी आरोग्यसेवेच्या दृष्टीने दवाखाना या संकल्पनेला प्रत्यक्ष रूप दिले. कालांतराने तो दवाखाना केवळ उपचार केंद्र न राहता या शहराच्या स्त्री-आरोग्याचे वैभव म्हणून ओळखला जाऊ लागला.

दवाखाने अनेक असतात, डॉक्टरही अनेक असतात; पण जेव्हा त्या दवाखान्याला सेवालय होण्याचे बळ मिळते आणि डॉक्टरला सामाजिक सेवेचा हातखंडा लाभतो, तेव्हा त्याची ओळख वेगळी ठरते. डॉ. मीना जोशी यांच्याबाबतीतही असेच घडले.

त्या प्रत्येक रुग्णाशी आधी समुपदेशन करतात आणि नंतर उपचार. स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून काम करताना मुलींची संख्या वाढली पाहिजे, मुलगी म्हणजे लक्ष्मीचे रूप आहे, मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे, मुलींनीही मुलांप्रमाणे धाडसाने पुढे गेले पाहिजे, या अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषयांना त्यांनी हात घातला.

स्त्रीरोगतज्ज्ञ, प्रसूतीत हातखंडा आणि स्त्रियांच्या आजारांवर मूळ औषध देणारी डॉक्टर अशी मीना यांची ओळख होती; पण केव्हा त्या स्त्रियांच्या सामाजिक मतपरिवर्तनाच्या सल्लागार बनल्या, हे कुणालाच कळले नाही.

मागील वीस, पंचवीस वर्षांत त्यांनी खूप मोठा पल्ला गाठला. त्यांचे कार्य केवळ धर्माबादपुरते किंवा आसपासच्या ६० गावांपुरते मर्यादित राहिले नाही; ते जिल्हा आणि राज्य पातळीवर एका सक्षम समुपदेशकाच्या रूपाने विस्तारत गेले. सात हजारावून अधिक प्रसूती तेही दोषमुक्त असे रिकॉर्ड डॉ. मीना यांच्या नावे आहे.

वैद्यकीय क्षेत्रातून समाजपरिवर्तन घडवून आणणारा कुठलाही जागतिक पातळीवरचा सर्वोच्च पुरस्कार असेल, तर तो डॉ. मीना जोशी यांना दिला पाहिजे, असे म्हणणारे त्यांचे हजारो रुग्ण, सामाजिक कार्याचे चाहते आज नव्या विचारांच्या, नव्या धाटणीच्या महाराष्ट्राला दिशा देण्यासाठी सज्ज आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यात गुंजोटी नावाचे छोटेसे गाव. या गावातील संस्कार आणि प्रतिभेसाठी ओळखले जाणारे देशपांडे कुटुंब, नर्मदा देशपांडे आणि नागोराव देशपांडे या पती,पत्नीला कदाचित कल्पनाही नव्हती की, त्यांच्या पोटी जन्मलेली मीना ही मुलगी स्त्री-परिवर्तनासाठी एक सशक्त आविष्कार ठरेल.

गुंजोटी, सोलापूर आणि विविध विद्यापीठांमधून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जिथे अनेक शिकलेले डॉक्टर जाण्याचे टाळतात, अशा ग्रामीण भागात जाऊन रुग्णसेवा करायची, हा ठाम मानस डॉ. मीना यांनी केला. त्यातूनच डॉ. मीना यांचा हा जोरकस प्रवास सुरू झाला.

आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्त्री-परिवर्तनाची लढाई लढणाऱ्या अनेक सेवेकऱ्या आहेत. त्या प्रत्येकीची दखल घेणे कदाचित शक्य नसेल; पण ज्यांनी आपल्या कार्याचा असा दीप प्रज्वलित केला की त्या प्रकाशामुळे संपूर्ण राज्याला नवी ओळख, दिशा मिळाली, त्यात डॉ. मीना यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. महिलांचा विकास, महिलांची उन्नती आणि महिलांचा हक्काचा बुलंद आवाज ही अत्यंत किचकट प्रक्रिया जर चिरंतर टिकवायची असेल, तर त्यासाठी डॉ. मीना यांच्यासारखा भक्कम आधार आवश्यक आहे.





माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार
mahasagarngp@gmail.com

डॉ. मीना म्हणतात, आज ग्रामीण महाराष्ट्राकडे पाहायला कुणालाही वेळ नाही. मी जेव्हा ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रत्येक स्त्रीकडे डॉक्टर म्हणून पाहते, तेव्हा लक्षात येते, आपण चंद्रावर जाण्याच्या गप्पा मारतो; पण ती बिचारी अजूनही भाकरीच्या चंद्राचा शोध घेत हरवलेली असते. तिला स्त्री-शिक्षणाचे महत्त्व माहीत नाही. माझी मुलगी शिकली तर ते किती मोठे बळ आहे, याची जाणीव नाही. माझ्या घराचा खरा आधार मीच आहे, हेही तिला माहीत नाही.

या सगळ्या गोष्टींची जाणीव करून देणे गरजेचे आहे. संपूर्ण कुटुंबाचा आधार असलेली ती एकमेव माऊली असते; पण तिचा दर्जा मात्र दुय्यम ठेवला जातो. स्त्रीचे केवळ शारीरिक आरोग्य चांगले असून चालत नाही; तिची मानसिकता समजून घेऊन तिला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा लागेल.

आज महाराष्ट्रात असा एकही जिल्हा नाही, जिथे सामाजिक विचारांच्या अनुषंगाने मी पाऊल ठेवले नाही. प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण सावलीत मला ती स्त्री आजही झिजताना दिसते. तुम्ही कितीही परिवर्तनाच्या गप्पा मारा, तिला कितीही तू बदल असे सांगा, ती बदलत नाही, कारण तिला बदलू दिले जात नाही. हीच खरी शोकांतिका आहे. त्यातही मी माझा लढा कायम ठेवला आहे.

मीना सांगतात, आमच्या गुंजोटी गावात राघवेंद्र साईवाले नावाचे आयुर्वेदिक डॉक्टर होते. ते केवळ डॉक्टर नव्हते; ते माणसांच्या अपेक्षांचे केंद्र होते.

त्यांच्या दवाखान्यात पाऊल टाकले की मानसिक आणि शारीरिक ओझे हलके व्हायचे. त्या वेगळेपणाचे निरीक्षण मी तेव्हाच केले, आणि तेव्हाच ठरवले हा पायंडा आपण पुढे राज्यभर पडायचा. आज मानसिक आरोग्यावर अधिक काम करण्याची गरज आहे, म्हणूनच मी राज्यभरात हे काम सुरू केले आहे. मी ज्यांना खोलवर शिकवण्यात यशस्वी झाले, त्या असंख्य डॉ. मीना यांचे काम नेटाने पुढे नेतात, जी माझी सर्वात मोठी कमाई ठरली.

डॉ. मीना यांचे विचार मनाच्या कप्प्यात कोरून ठेवावे असेच आहेत, त्या म्हणतात, स्त्री परिवर्तन ही केवळ एका वर्गाची किंवा एका दिवसाची लढाई नाही, तर ती समाजाच्या मानसिकतेत बदल घडवण्याची दीर्घ प्रक्रिया आहे.

स्त्रीला माणूस म्हणून समान अधिकार, संधी आणि सन्मान मिळावा, यासाठी समाजाने काही टप्पे पार केले आहेत; पण अजूनही बराच पल्ला गाठायचा आहे. स्त्री परिवर्तनासाठी आतापर्यंत काय केले गेले आहे आणि पुढे अधिक जागरूक होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे, हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**आतापर्यंत काय केले गेले आहे?**

स्त्री शिक्षणाची दारे उघडणे हा स्त्री परिवर्तनाचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरला. सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, रमाबाई रानडे यांसारख्या थोर स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीला आत्मभान दिले. शिक्षणामुळे स्त्रीला प्रश्न विचारण्याची, निर्णय घेण्याची आणि स्वतःच्या आयुष्याचा विचार करण्याची ताकद मिळाली.

कायदे आणि घटनात्मक हक्कांच्या माध्यमातून स्त्री सुरक्षिततेसाठी आणि समानतेसाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली गेली. स्त्री शिक्षणाचा अधिकार, घटस्फोट, वारसा हक्क, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळविरोधी कायदे, घरगुती हिंसाचारविरोधी कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा यामुळे स्त्रीला कायदेशीर आधार मिळाला.

स्वयं-सहायता गट, बचत गट, महिला मंडळे यांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला झाला. ग्रामीण भागात महिलांनी शेतीपूरक व्यवसाय, हस्तकला, बचत गटांमधून स्वतःची ओळख निर्माण केली. आर्थिक स्वावलंबनामुळे स्त्रीच्या निर्णयक्षमतेत वाढ झाली.

साहित्य, कला, चित्रपट, नाटक, माध्यमे यांच्या माध्यमातून स्त्रीच्या प्रश्नांना वाचा फोडली गेली. स्त्री अनुभव, तिचे दुःख, संघर्ष, स्वप्ने यांना समाजासमोर आणण्याचे काम लेखिका, कवयित्री, पत्रकार, कलाकार यांनी केले. यामुळे स्त्रीविषयी समाजाची दृष्टी काही प्रमाणात बदलली.

या सर्व प्रयत्नांनंतरही स्त्री अजूनही अनेक स्तरांवर असुरक्षित आहे. स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता अनेकदा बदललेली नाही. कौटुंबिक पातळीवर निर्णयस्वातंत्र्य, करिअरची निवड, विवाह, मातृत्व याबाबत स्त्रीला पूर्ण स्वातंत्र्य मिळत नाही. ग्रामीण आणि शहरी, शिक्षित आणि अशिक्षित असा भेद न करता स्त्रीवरील हिंसा, लैंगिक छळ, मानसिक दडपण, कौटुंबिक अत्याचार सुरूच आहेत. कायदे असूनही त्यांची अंमलबजावणी आणि सामाजिक स्वीकार यामध्ये मोठी दरी आहे.

सर्वप्रथम मानसिक परिवर्तन घडवणे अत्यावश्यक आहे. स्त्री परिवर्तन हे केवळ स्त्रियांचे काम नाही, तर पुरुष, कुटुंब आणि समाज यांचा एकत्रित सहभाग आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुला-मुलींमध्ये समानतेचे संस्कार रुजवले पाहिजेत. घरात कामाची विभागणी, निर्णयप्रक्रिया आणि जबाबदाऱ्या समान असाव्यात. शिक्षण केवळ पुस्तकी न राहता संवेदनशील आणि मूल्याधिष्ठित असले पाहिजे. शाळा-महाविद्यालयांमध्ये लैंगिक समानता, संमती, मानवी हक्क, स्त्री-पुरुष संबंध यांवर खुले संवाद घडले पाहिजेत.

आर्थिक स्वावलंबनाला अधिक व्यापक स्वरूप देणे गरजेचे आहे. महिलांसाठी कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी सुलभ कर्ज व्यवस्था निर्माण केली पाहिजे. आर्थिकदृष्ट्या सक्षम स्त्रीच अन्यायाविरुद्ध उभे राहू शकते.

कायदे केवळ कागदावर न राहता प्रभावीपणे राबवले गेले पाहिजेत. पोलिस, न्यायव्यवस्था, प्रशासकीय यंत्रणा या स्त्रीसंवेदनशील असल्या पाहिजेत. पीडित स्त्रीला दोष देण्याऐवजी तिला न्याय मिळेल, असे वातावरण निर्माण झाले पाहिजे.

माध्यमे आणि सोशल मीडियाची जबाबदारीही मोठी आहे. स्त्रीला केवळ वस्तू किंवा आकर्षण म्हणून न मांडता तिच्या संघर्षाची, क्षमतेची आणि यशाची सकारात्मक मांडणी होणे गरजेचे आहे.

स्त्रियांनीही स्वतःबद्दल जागरूक होणे तितकेच महत्त्वाचे आहे. आपले हक्क, आपली सुरक्षितता, आपले आरोग्य याबाबत सजग राहणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे ही सामूहिक शक्ती स्त्री परिवर्तनाला गती देऊ शकते.

स्त्री परिवर्तन म्हणजे केवळ कायदे, योजना किंवा घोषणांचा विषय नाही. तो समाजाच्या अंतःकरणाशी जोडलेला प्रश्न आहे. जेव्हा स्त्री मुक्तपणे विचार करू शकेल, निर्णय घेऊ शकेल आणि सुरक्षितपणे जगू शकेल, तेव्हाच ख?या अथार्ने परिवर्तन घडेल. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, संवेदनशीलता आणि सामूहिक जबाबदारी स्वीकारणे हीच काळाची गरज आहे.

मागील पंचवीस वर्षांचा डॉ. मीना यांचा सामाजिक प्रवास निश्चितच थक्क करणारा आहे. महिलांबद्दलची कळवळा, महिलांचे हक्क आणि महिलांचे आरोग्य यासाठी झटणाऱ्या डॉ. मीना आज त्या प्रत्येक स्त्रीचे प्रतिबिंब आहेत, जिला वाटते, ही परिस्थिती बदलली पाहिजे, इथे नवे वेगळेपण उभे राहिले पाहिजे. डॉ. मीना जोशी यांच्या या चिरंतर टिकणाऱ्या कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा.

-----------------

डॉक्टर मीना जोशी संपर्क क्रमांक
8806318116

■ ■ ■

## अनन्या पांडेने मोठ्या संकल्पांऐवजी साध्या सवयींना प्राधान्य दिले आहे या नवीन वर्षात



**मुंबई, १२ जानेवारी :** अनन्या पांडेने २०२६ मध्ये पाऊल ठेवत स्वत:ला प्रामाणिक ठेवले आहे. एका नव्या इंस्टाग्राम रीलमध्ये, अभिनेत्री आरशासमोर एक खुला क्षण शेअर करताना दिसते, जिथे ती स्वत:शी बोलत आहे आणि नवीन वर्षाच्या संकल्पांबरोबर येणाऱ्या परिचित तणावावर मार्गदर्शन करते.

वेळ किती लवकर निघून जातो आणि 'नवीन वर्ष, नवीन मी' या कल्पनेसोबत अनेकदा चिंता कशी येते, हे मान्य करत अनन्याने अधिक वास्तववादी दृष्टिकोन निवडला आहे अशक्य मानकांचा पाठलाग करण्याऐवजी लहान, शाश्वत सवयींवर लक्ष केंद्रित करणे. चांगली झोप घेणे आणि पुरेसे पाणी पिण्यापासून ते नियमित व्यायाम करण्यापर्यंत, तिचा संदेश परिपूर्णतेपेक्षा सातत्यावर अधिक भर देतो.

ती तिच्या सकाळच्या दिनचर्येतील एका साध्या सवयीवरही प्रकाश टाकते: दिवसाची सुरुवात मूठभर कॅलिफोर्निया बदामांनी करणे. ऊर्जेचा नैसर्गिक स्रोत असलेले बदाम तिला दिवसभरासाठी ऊर्जा देतात, तर त्यांमधील आरोग्यदायी चरबी आणि व्हिटॅमिन ई त्वचेच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकणारे वृद्धत्वविरोधी गुणधर्म देतात, असे दिसून आले आहे.

सोपे आणि आत्मसात करता येण्याजोगे, रीलचा शेवट एका उबदार, वैयक्तिक संदेशावर होतो; अनन्या पांडे सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत पुढील वर्ष अधिक दयाळू व विचारपूर्वक घडावे, असा मूड तयार करते.

# ग्रामीण भारतात अन्ननलिकेचा कर्करोग दुर्लक्षित केला जात आहे, अभ्यासातून समोर आले



**वर्धा, १२ जानेवारी :** ग्रामीण महाराष्ट्रातील एका तृतीयक आरोग्य संस्थेच्या नव्या अभ्यासात एक गंभीर बाब समोर आणली आहे की अन्ननलिकेचा कर्करोग असलेले रुग्ण उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये खूप उशिरा येतात, तेव्हा कर्करोगावर पूर्णपणे उपचार करणे शक्य नसते.

हा अभ्यास २०२२ ते २०२५ दरम्यान आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय (एव्हीबीआरएच), सावंगी, वर्धा येथे करण्यात आला होता. यात अन्ननलिकेच्या कर्करोगाच्या ११० रुग्णांची तपासणी केली गेली. अभ्यासात आढळले की हा रोग मुख्यतः लोकांच्या कामकाजाच्या सक्रिय वयात दिसतो, बहुतेक रुग्णांमध्ये हा कर्करोग उशिरा निदान होतो, आणि बहुसंख्य रुग्णांसाठी शस्त्रक्रियेद्वारे उपचार आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसतो.

स्क्वॅमस सेल कर्करोग जास्त आढळला: पश्चिम देशांमध्ये अन्ननलिकेचा अॅडेनोकार्सिनोमा वाढत आहे, पण वर्धा अभ्यासात ८०९१% रुग्णांमध्ये स्क्वॅमस सेल कर्करोग आढळला. हा रोग तंबाखू, मद्यपान आणि खर्रा सेवनामुळे होतो आणि या सवयी अजूनही ग्रामीण भागात सामान्य आहे.

महिला पुरुषांपेक्षा जास्त प्रभावित: आकडेवारीनुसार कर्करोगाच्या रुग्णांपैकी ५६.३६% महिला होत्या, जे पुरुषांपेक्षा जास्त आहे. यामध्ये घरकाम करणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक होती, त्यामुळे हा जोखमीचा गट अनेकदा दुर्लक्षित राहतो हे दिसून आले. बहुतेक रुग्ण ५१७० वर्षे वयोगटातील होते, परंतु त्यात २१ वर्षांपासून ८८ वर्षे वयोगटातील रुग्ण देखील आढळले. निदानाच्या वेळी ४१.८२% रुग्णांचे वजन कमी होते, जे गंभीर पोषणाच्या कमतरतेकडे निर्देश करते आणि उपचारांवर नकारात्मक परिणाम करते.

डॉ. विजेंद्र वी. किरनाके, प्रोफेसर आणि प्रमुख, गॅस्ट्रोएंटेरॉलॉजी विभाग यांनी सांगितले, आमच्याकडे येणारा बहुतेक रुग्ण ग्रामीण भागातील असतो. अनेकदा रुग्ण ५०६० वर्षांची महिला असते, जिचे वजन खूप कमी झालेले असते आणि तिला गिळताना त्रास होत असतो. तोपर्यंत कर्करोग पुढच्या टप्प्यात पोहोचलेला असतो.

## सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत विराट धाडसी दावा करतो की, अन्विता पुन्हा त्याच्याकडे येणार



**मुंबई, १२ जानेवारी :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुणीचा भावनिक प्रवास दाखवला आहे, जी प्रत्येक अडीअडचणीत आपल्या वडिलांच्या (सुहास वरुण बडोला) आणि भावंडांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. अन्विता एका गुंतागुंतीच्या त्रिकोणात अडकली आहे. संजयचा (ऋषी सक्सेना) सहवास तिला आनंद देत नाही, त्याचे वर्तन पाहून तिला धक्का बसला आहे आणि दुसरीकडे, त्यांच्या साखरपुड्याच्या दिवशीच तिला सोडून जाणारा विराट, तिने घेतलेल्या निर्णयाचा विरोध असूनही तिला गुपचुपपणे मदत करत तिच्या जीवनात परत दाखल झाला आहे.

आगामी भागांमध्ये, विराट आणि अन्विता यांच्यातील तणाव वाढत जातो आणि कॅफेमध्ये वारंवार त्यांच्यात खटके उडू लागतात. पण यामधून हे उघड होते की, या सगळ्या रागाच्या मागे विराटचे अन्वितावरील प्रेम अजून अबाधित आहे. यानंतर एक टर्निंग पॉइंट येतो, जेव्हा विराट एका पार्टीत ध्रुवी (गरिमा कौशल)ला घेऊन येतो. त्यांना पाहून अन्विताला मत्सर वाटतो आणि मनात दडपून टाकलेल्या भावना पुन्हा उफाळून येतात. विराटला हे समजते आणि तो तिला तिच्या भावना कबूल करायला सांगतो. यावेळी अमृताची मैत्रीण दिया (मेघना कुकरेजा) बेधडकपणे हस्तक्षेप करते, त्यांच्या मनात गोंधळ असल्याचे सांगते, विराटला हे पटवून देते की तो स्वतः मान्य करत नसला तरी, त्याच्या कृती त्याच्या मनातील प्रेमातून स्फुरलेल्या आहेत. यानंतर विराट अन्विताला बेधडकपणे सांगतो की, तिचे त्याच्यावर अजूनही प्रेम असल्याचे त्याला माहीत आहे आणि आत्मविश्वासाने पुढे हे देखील सांगतो की, एक दिवस ती नक्की त्याच्याकडे परत येईल आणि स्वतः आपल्या प्रेमाची कबुली देईल. तिचा कॅफे आणि तिच्या जीवनाचा ताबा घेण्याची धमकी देत आपले वर्चस्व देखील तो दाखवून देतो.

विराटची भूमिका करणारा रजत वर्मा म्हणतो, विराटच्या व्यक्तिमत्त्वात अनेक कंगोरे आहेत. वरकरणी तो काहीसा उद्धट आणि वर्चस्व गाजवणारा तरुण वाटतो, पण मनातून तो निरंतर अन्वितावर प्रेम करत आला आहे. त्याच्या कृती बऱ्याचदा अहंकार आणि अपराधी भावनेतून जन्मतात. त्यामुळे त्याचा प्रवास खूप उत्कट आहे. आगामी भागांमध्ये, विराटला स्वतःच्या भावनांचा स्वीकार करावा लागतो. ही गोष्ट त्याच्यासाठी सोपी नाही. त्याच्या मनातील प्रेम आणि अभिमान यांच्यातील संघर्ष त्याच्या स्वभावाच्या मुळाशी आहे. मला वाटते की, प्रेक्षक हे समजू शकतील की, हा संघर्ष किती गोंधळ वाढवणारा पर खरा आहे.

# पीएनजी ज्वेलर्स तर्फे २०२६ चे चेन अँड बँगल्स महोत्सवने स्वागत

**नागपूर, १२ जानेवारी :** भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह वारसाहक्क लाभलेला दागिन्यांचा ब्रँड पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित चेन अँड बँगल्स महोत्सवासह सज्ज झाला आहे. ५ जानेवारी २०२६ पासून देशभरातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूम्समध्ये सुरू होणारा हा महिनाभराचा महोत्सव, दैनंदिन वापरासाठी तसेच सण-समारंभांसाठीउपयुक्त अशा दोन प्रकारचे दागिने ग्राहकांना उपलब्ध करून देतो.

या महोत्सवात दैनंदिन वापरासाठी लागणारे दागिने, भेटवस्तू किंवा खास प्रसंगांसाठी अनुरूप अशा उत्तम दर्जाच्या सोन्याच्या चेन, आकर्षक बांगड्या तसेच अतिशय सुंदर अशा हिऱ्यांच्या बांगड्यांचा समावेश आहे. उत्कृष्ट कारागिरी आणि दीर्घकाळ टिकणारी डिझाईन्स असलेले दागिने ग्राहकांना उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

महोत्सवाच्या अंतर्गत, ग्राहकांना सोन्याच्या चेन आणि बांगड्यांवर प्रति ग्रॅम रुपये ५१५ इतकी थेट मेकिंग चार्ज सवलत



मिळणार आहे. यासोबतच, हिऱ्याच्या बांगड्यांच्या मेकिंग चार्जवर थेट ५० टक्के सूट देण्यात येत आहे. ही ऑफर ५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूम्समध्ये वैध असेल.

या उपक्रमाविषयी बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, भारतीय विवाहसंस्कृतीत चेन आणि बांगड्यांना विशेष स्थान आहे. हे दागिने वारसा म्हणून पुढील पिढ्यांकडे सुपूर्द केले जातात आणि विश्वास व सातत्याचे प्रतीक देखील मानले जातात. पीएनजी ज्वेलर्समध्ये असलेले मूल्य, वैविध्य आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा संगम साधण्याची आमची बांधिलकी या महोत्सवातून दिसून येते.

चेन अँड बँगल्स महोत्सवच्या निमित्ताने, नवीन वर्षाची सुरुवात परंपरा, शैली आणि सुंदर दागिने खरेदीच्या आनंदात साजरी करण्यासाठी पीएनजी ज्वेलर्स आपल्या सर्व ग्राहकांना आमंत्रण देत आहे.

## लव्ह जिहाद व धर्मांतर म्हणजे भारताला कमकुवत करण्याचे ईस्ट इंडिया कंपनीसारखे मोठे षड्यंत्र ! : जगद्गुरु शंकराचार्य



**पुणे, १२ जानेवारी :** लव्ह जिहाद आणि धर्मांतराची वाढती प्रकरणे ही भारतीय संस्कृती, सनातन धर्म आणि हिंदुस्थानला कमकुवत करण्यासाठी आखलेले एक नियोजित षड्यंत्र असल्याचे प्रतिपादन द्वारका शारदा पीठाधीश्वर श्रीमद जगद्गुरु शंकराचार्य स्वामी सदानंद सरस्वती महाराज यांनी केले आहे. या संकटाचा ऐतिहासिक संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे ईस्ट इंडिया कंपनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आली आणि कपटाने देशाला गुलाम बनवून २०० वर्षे राज्य केले, तसेच काहीसे संकट आज छद्म रूपाने धर्मांतराच्या माध्यमातून उभे ठाकले आहे. आज भारताचे संरक्षण मंत्रालय आणि लष्करी सामर्थ्य इतके प्रबळ आहे की कोणताही देश आपल्यावर थेट आक्रमण करण्याचे धाडस करू शकत नाही, म्हणूनच विशिष्ट लोकसंख्या वाढवून देशाला अंतर्गतरीत्या दुर्बल करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पुणे येथे वेदाचार्य घैसासगुरुजी वेदपाठशाळेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात त्यांनी भागवत कथेचे भावरसमय निरूपण केले. त्यानिमित्ताने हिंदु जनजागृती समिती आणि राष्ट्रभक्त अधिवक्ता समितीच्या अधिवक्त्यांनी शंकराचार्यांची भेट घेतली. त्यांनी वरील मार्गदर्शन केले. श्रीमद जगद्गुरु शंकराचार्य यांनी समितीच्या कार्याला आशीर्वाद देऊन हिंदु जनजागृती समिती खूप चांगले कार्य करत आहे, असे म्हटले.

जगद्गुरु शंकराचार्य महाराजांनी स्पष्ट केले की, धर्मांतर आणि लव्ह जिहादचा हा प्रकार केवळ धार्मिक नसून राजकीय वर्चस्व मिळवण्याची एक दूरगामी योजना आहे. लोकशाहीत बहुमत हाच सत्तेचा आधार असतो. त्यामुळे हिंदूंची संख्या कमी करणे आणि स्वतःची लोकसंख्या वाढवणे हा एक सुनियोजित कट आहे, जेणेकरून भविष्यात मताधिकाराच्या जोरावर शासन व्यवस्था आपल्या हातात घेता येईल. याचप्रमाणे ख्रिश्चन मिशनरीसुद्धा सेवेचे माध्यम वापरून प्रलोभने देऊन सामान्य हिंदूंचे धर्मांतर करत आहेत. या षड्यंत्राला पायबंद घालण्यासाठी शंकराचार्यांनी अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारने सुद्धा लव्ह जिहादविरोधात अत्यंत कठोर कायदा करावा, अशी आग्रही मागणी केली आहे.

ज्याप्रमाणे अल्पसंख्याकांना त्यांच्या मदरसा आणि चर्चमध्ये धर्मशिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य आहे, त्याचप्रमाणे शिक्षण मंत्रालय आणि मानव संसाधन मंत्रालयाने शासकीय व निमशासकीय शाळांमध्ये हिंदू मुलांना हिंदु धर्मशिक्षण अनिवार्य करावे, असे विधान त्यांनी केले. जर मुलांना शालेय जीवनापासूनच आपल्या धर्माचे आणि संस्कारांचे ज्ञान मिळाले, तर ते कोणत्याही प्रलोभनाला किंवा षड्यंत्राला बळी पडणार नाहीत. सर्व राजकीय पक्ष, मुख्यमंत्री आणि राष्ट्रप्रेमी संस्थांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून एकत्र यावे, असे आवाहनही शंकराचार्यांनी केले.

## पतंग, कृतज्ञता आणि नवीन शुभारंभ: सोनी सबचे कलाकार सांगत आहेत आपल्या मकर संक्रांतीच्या सेलिब्रेशनविषयी

**मुंबई, १२जानेवारी:** आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून जाते आणि घराघरात आप्तस्वकीय आणि मित्रमंडळींची वर्दळ वाढते. मकर संक्रांत घेऊन येते नवीनता, कृतज्ञता आणि सहवासाचा आनंद. शुभारंभ, आशा आणि सकारात्मकतेचा आनंद घेऊन येणाऱ्या या कापणीच्या सणाविषयी सोनी सबवरील कलाकार श्रेनु परीख, करुणा पांडे, नितीन बाबू, दीक्षा जोशी, नेहा एस. के. मेहता, ऋषी सक्सेना आणि सुंबुल तौकीर खान सांगत आहेत की त्यांच्या लेखी या सणाची लक्षणीयता काय आहे. आपल्या कुटुंबाच्या परंपरा आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा देताना आशा आणि ऐक्याच्या या उत्सवाचा आनंद कसा छोट्या छोट्या गोष्टींत सामावेलेला आहे, हे आपल्या शब्दांत सांगत आहेत.

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत देवी पार्वतीची भूमिका करणारी श्रेनु परीख म्हणते, मकर संक्रांती हा पहिल्यापासून माझा आवडता सण आहे. माझ्या शहरात वडोदरा येथे त्याला उत्तरायण म्हणतात. येथे १४ आणि १५ जानेवारी हे दोन्ही दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत पतंग उडवण्यासाठी राखलेले असतात. थंडीत सुखावह वाटणारे ऊन अंगावर घेत, गाजर, बोरं, आवळे, चिक्की, उंधियुचा आस्वाद घेत घेत पतंग उडवण्याचा आनंद घ्यायचा! मला पतंग उडवायला खूप आवडते. आणि आजही या सणाचा आनंद घेण्यासाठी माझे देश-विदेशातील मित्र-मैत्रिणी आवर्जून संक्रांतीत बडोद्यात येतात. माझा विवाह मराठी कुटुंबात झाल्यामुळे या सणाची आणखी एक सुंदर बाजू मला समजली. गेले वर्ष माझ्यासाठी खास होते, कारण त्यावेळी लग्न झाल्यानंतरची माझी पहिली संक्रांत होती. आम्ही घरी हळदीकुंकू ठेवले होते. सुवासिनी सुंदर काळ्या रंगाच्या साडीत, हलव्याचे दागिने घालून आमच्याकडे हळदीकुंकवाला आल्या होत्या आणि तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला म्हणत सगळ्यांनी एकमेकींना तिळगूळ दिला. जीवन कितीही धकाधकीचे असले तरी या परंपरा जिवंत ठेवण्याचा माझा प्रयत्न आहे, ज्यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होतो.

इत्ती सी खुशी मालिकेत -संजय भोसलेची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, मला पहिल्यापासून मकरसंक्रांती हा सकारात्मकता आणि नूतनीकरणाचा सण वाटतो. लहान असताना या दिवशी लवकर उठून झटपट तयार होऊन आख्खा दिवस गच्चीत पतंग उडवण्यात घालवायचो. सोबत शेजारी-पाजारी आणि नातेवाईकांचा घोळका असायचा. खूप हास्य विनोद, खेळकर स्पर्धा आणि अर्थात तिळगूळ आणि चिक्कीचा आस्वाद! आता मी मुंबईतच राहात असल्यामुळे आणि मराठी मनोरंजन उद्योगात काम केल्यामुळे तिळगूळ हा माझ्यासाठी संक्रांतीच्या परंपरांचा अविभाज्य भाग बनला आहे. मला या गोष्टीचा अचंबा वाटतो की कसे आपले सण आपल्याला नकारात्मकता सोडून जीवनातील गोडवा टिपायला शिकवतात. आता माझ्या शूटिंगच्या व्यस्ततेत देखील ही परंपरा माझ्या पद्धतीने जिवंत ठेवण्याचा माझा प्रयत्न असतो. मी सेटवर सगळ्यांसाठी मिठाई आणतो आणि सणाचा आनंद अनुभवतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका करणारी दीक्षा जोशी म्हणते, मी गुजरातची असल्यामुळे मकर संक्रांतीचे माझ्यासाठी खास महत्त्व आहे. माझ्यासाठी उत्तरायण हे केवळ एक दिवसाचे सेलिब्रेशन नसायचे. मित्र-मैत्रिणी, सणाचे खास पदार्थ, संगीत आणि पतंग उडवण्याचा हा मोठा उत्सव असायचा. उंधियु-जलेबी खाण्यापासून ते गच्चीतून कायपो छे म्हणून आरोळी ठोकण्यातील मजा काही औरच! आता पुष्पा इम्पॉसिबल परिवारासोबत काम करत असताना हा सण साजरा करताना मी जुन्या आठवणींत रमते. पण तुम्ही कुठेही असलात तरी परंपरा जिवंत राहतात हे पाहताना धन्यता वाटते.

इत्ती सी खुशी मालिकेत हेतलची भूमिका करणारी नेहा एस. के. मेहता म्हणते,



मकरसंक्रांतीचा सण हा सणवार लोकांना कसे एकत्र घेऊन येतात याचा प्रत्यय देतो. आपल्या नातेवाईकांसोबत पतंग उडवण्याच्या, मिठाईची देवाणघेवाण करण्याच्या आणि छोट्या छोट्या आनंदांचा आस्वाद घेण्याच्या सुंदर आठवणी माझ्याजवळ आहेत. गोड बोलावे, दयाळू असावे आणि साकारात्मकतेने पुढे जावे हा या सणाचा संदेश मला फार आवडतो. सेटवरील लहान मुले आणि मालिकेच्या एकंदर टीमसोबत हा सण साजरा करताना आनंदात भर पडते आणि हा सण अधिकच आपलासा आणि विशेष वाटतो.


## आज का अंदाज

### मंगळवार १३ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| १ - ४ - ७ - ८ | २ - ५ - ६ - ७ |
| ३८० - २५७ - २६९ - ३७८ | १३८ - २४९ - २४० - १७९ |
| ४७० - ३३८ - ४५८ - २२४ | ३४५ - ४५६ - ३६७ - २५० |
| ५६० - १४९ - १८८ - १६६ | ४८० - ३५७ - ४६६ - ३४० |
| जोडी | जोडी |
| १९ - ४९ - ७२ - ८२ | २४ - ५४ - ६१ - ७१ |
| १० - ४० - ७५ - ८५ | २८ - ५८ - ६९ - ७९ |
| १३ - ४३ - ७६ - ८६ | २२ - ५५ - ६० - ७० |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १३ जानेवारी

### मंगळवार १३ जानेवारी २०२६

सर्व बाजार साठी

२१ - ३१ - ६० - ९०
२४ - ३४ - ६८ - ९८
२७ - ३७ - ६५ - ९५

६७९ - २३८ - १६९ - ९००
४९९ - ५८० - २६८ - ४५०
२०० - ६७० - ३६७ - ५५९

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११९ | | ४९० | | ४४६ | | ४८० | | २५८ | | १६९ | |
| ३३५ | १ | ५८० | ३ | ६८० | ४ | ५७० | २ | ७८० | ५ | २६८ | ६ |
| २९० | | ६७० | | ५९० | | ६६० | | ३५७ | | ३६७ | |

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५० | | १९० | | ६०० | | ८९० | | ८०० | | १४४ | |
| ४४० | ८ | २८० | ० | १५० | ६ | ३४० | ७ | २६० | ८ | ५७७ | ९ |
| ५५८ | | ३७० | | २६८ | | २५० | | ३६९ | | ४५० | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
१ - २ - ३ - ० - ९

जबरदस्त पास होणारे चान्सेस
प्रो. बालाजी कुमार 9822486034


## आजचे राशिभविष्य

**मेष :** प्रकृतीकडे लक्ष पुरवा.आज इतरांना मदत केल्याने फायदा होईल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांनी अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे. कामात निष्काळजीपणा केल्यास नुकसान होईल.

**वृषभ :** आजचा दिवस विशेष शुभ आहे. भावनिक नाती अधिक घट्ट होतील. आत्मविश्वास आणि संवेदनशीलता प्रियजनांशी जवळीक वाढवेल. तुमच्या जोडीदारासोबत बाहेरचा आनंद घ्या.

**मिथुन :** तुम्ही तुमच्या भावना स्पष्टपणे व्यक्त करू शकाल, ज्यामुळे नाती अधिक दृढ होतील. जोडीदारासोबत संवाद गोड आणि मनापासून होईल. जुन्या मित्रांशी भेट होऊ शकते. खुले मन ठेवा.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे पार करण्याचा प्रयत्न करा. आज, तुमच्या आंतरिक शक्तीमुळे कामाच्या ठिकाणी तुमचा दिवस चांगला जाण्यास मदत होईल. जीवन आनंदी राहील.

**सिंह :** महत्वाच्या निर्णयाला घरच्यांकडून पाठिंबा मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल. एखाद्या प्रतिष्ठित कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** तुमचे मन ताजेतवाने होईल. कलांमध्ये रस असलेल्यांना हा दिवस अनुकूल वाटेल. तुमच्या कलेची प्रशंसा देखील होऊ शकते. सामाजिक जीवनातही हा काळ अनुकूल आहे.

**तूळ :** आजचा दिवस अतिशय शुभ आहे. एकूणच अंतर्गत समृद्धी आणि आत्मविश्वास वाढेल. आज तुम्ही लोकांशी अधिक चांगले नाते निर्माण कराल आणि स्वतःला सकारात्मक आणि यशस्वी वाटेल.


**वृश्चिक :** संवेदनशील विषयांवर बोलताना काळजी घ्या. शांत राहणे महत्त्वाचे आहे. भावना समजून घ्या आणि कुटुंबीय वा मित्रांशी मोकळेपणाने बोला. नकारात्मकता टाळा.

**धनु :** आज तुम्ही नवीन व्यवसायाची योजना देखील आखाल. महत्वाच्या निर्णयामध्ये तुम्हाला कुटुंबातील सदस्यांकडून पाठिंबा मिळेल. तुम्ही मित्रांसोबत लांबच्या प्रवासाची योजना आखू शकता.

**मकर :** आजचा दिवस थोडा कठीण असू शकतो. आध्यात्मिक आणि वैयक्तिक प्रगतीत काही अडथळे येऊ शकतात. आत्मपरीक्षणाचा हा काळ आहे. नात्यांमध्ये चढ-उतार संभवतात.

**कुंभ :** आजचा दिवस थोडा गोंधळात टाकणारा असू शकतो. परिस्थितीबाबत संभ्रम जाणवेल. नात्यांमध्ये चढ-उतार होऊ शकतात. संयम ठेवा; परिस्थिती हळूहळू सुधारेल.

## शब्दकोडे क्रमांक २३२४



**आडवे शब्द :-**
१) धोंडामास, मलमास
५) धुणे
७) प्रगती, उमलणे, वाढ
९) श्रीमंत
११) चालू काळ
१२) कमळ
१३) बोजा, वजन
१४) दैव
१६) घोड्याचे तोंड, एक मराठी नाटक
१९) राष्ट्र
२१) केसांची लोंबती बट
२२) जिव्हाळा, माया
२३) मीठाची चव
२४) आशीर्वाद, उर्ध्व दिशा
२५) भूपती
२६) नगर
२८) पोपट
३०) लहान बाळाच्या हातातील कडे
३३) आजतागायत
३५) हस्त
३६) फळाचे साल
३९) कावळा
४०) लक्ष्मी नारायण
४२) विनाकारण
४३) व्यय
४४)रवाळ (तूप)
४५) पुष्कळ
४६) तुरुंग
४७) एक चतुर्थांश
४८) प्रश्न
५०) थंडगार हवेची लाट
५३) दरवाजा
५४) वणवा
५७) रात्र
५९) पळसाचा डिंक
६१) शेळीचे पिल्लू
६२) तजवीज
६३) एक तारवाद्य.

**उभे शब्द :-**
१) उर्मट, उद्धटभाषा
२) दया
३) बर्फाचा पर्वत
४) घोड्याच्या खूराला लावण्याची चंद्राकृती लोखंडी पट्टी
५) मीठ
६) लग्नाचा मुलगा
७) आकाशयान
८) गाल, कानाजवळचा भाग
१०) श्रीकृष्णाचे एक नाव
१५) मोठे, कुरुप (डोळे)
१६) निराश, हतबल
१७) माल साठविण्याची जागा
१८) नृत्यकलेचे दैवत
२०) लाज
२२) मौज,गंमत
२५) संतापी
२७) सीमा
२९) राबता, जाणेयेणे
३१) तारणपत्र
३२) स्वच्छ
३३) माला-माणसांचे जाणे-येणे
३४) लक्ष्मीचे एक नाव
३७) सुंदर तरुणी
३८) उत्कर्षाचा काळ
३९) अक्षरापुढची रेघ
४१) पहारेकरी
४४) मोठी घागर
४६) पाहिजे, वारा, वायू
४८) रस्ता
४९) एक मोठे चर्मवाद्य
५१) थेट, सरळ
५२) चांदी
५५) लाकूड छिलण्याचे एक हत्यार
५६) नको असता
५८) पाणी
६०) वाळवंट.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नवनीत राणांच्या अहंकाराचा घडा भरला?

## तर कोणत्याही क्षणी होणार 'शिशुपाल' सारखी अवस्था?

रोहित गासे

**अमरावती, ( दि. 12 ) - हिंदीतील एक प्रसिद्ध म्हण आहे, 'रस्सी जल गयी, मगर बल नही गया!' म्हणजेच सर्वकाही उद्धवस्त झाले तरी अहंकार जात नाही. नेमकी अशीच परिस्थिती माजी खासदार व भाजपच्या नेत्या नवनीत राणा यांच्या बाबतीत दिसून येत आहे. राजकारणातील त्यांची भूमिका पाहता महाभारतातील शिशुपालाची आठवण होते. शिशुपालाला श्रीकृष्णाने त्याच्या आईच्या इच्छेनुसार शंभर अपराध माफ करण्याचे वचन दिले होते. परंतु शंभर चुका पूर्ण होताच सुदर्शन चक्र चालले. आज नवनीत राणा यांच्या बाबतीतही तसेच काहीसे घडताना दिसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारंवार त्यांना संधी दिली, पाठबळ दिले. मात्र आता त्यांच्या अहंकाराचा घडा भरत चालल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.**

भाजपसारख्या देशातील क्रमांक एकच्या पक्षाकडून मोठा मान-सन्मान, संरक्षण आणि राजकीय बळ मिळाल्याने नवनीत राणांमध्ये एक वेगळाच अहंकार संचारलेला दिसतो. अमरावती जिल्ह्यातील सामान्य, कर्तव्यनिष्ठ आणि समाजाशी नाळ जोडून काम करणाऱ्या नेत्यांचा त्यांनी वारंवार अपमान केल्याचे अनेक प्रसंगातून समोर आले आहे. पक्षातील लहान-मोठ्या नेत्यांवर टीका करणे, उपहासात्मक भाषा वापरणे आणि त्यातून आनंद घेणे, हा जणू त्यांचा स्वभावच बनला आहे.

खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी वडीलबंधूप्रमाणे पक्षनिष्ठेचा सल्ला दिला असता, त्यांनाच मंत्री बावनकुळे यांच्या समोर अपमानित करण्याचा प्रकार घडला. यामुळे समस्त बहुजन समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या. यापूर्वी माजी आमदार प्रवीण पोटे पालकमंत्री असताना त्यांना 'बालकमंत्री' म्हणत अपमानित करण्यात आले. लोकसभा निवडणुकीच्या काळात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनाही 'पती-पत्नीमध्ये नाक खूपसू नका'! असे म्हणत सार्वजनिकरित्या सुनावण्यात आले.

या साऱ्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती.

लोकसभा प्रचारादरम्यान अचलपूर येथील सभेत 'मी 2019 मध्ये मोदींच्या लाटेतही मोदींच्या विरोधात अपक्ष म्हणून निवडून आले' असे वक्तव्य करून त्यांनी थेट पक्षश्रेष्ठींनाच टोला लगावला. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी माणसाला अंध बनवते, याचे हे ठळक उदाहरण आहे.

राणा दाम्पत्याने केवळ भाजप नेत्यांनाच नव्हे, तर विविध समाजघटकांतील नेतृत्वालाही लक्ष्य केले. संजय खोडके, अजित पवार, यशोमती ठाकूर यांच्याशी झालेले वाद, त्यांच्यावर केलेली टीका, अपमानास्पद भाष्य हे राजकारणाच्या मर्यादा ओलांडणारे होते. यशोमती ठाकूर यांनी खासदारकीसाठी मदत



केली, नातेसंबंध जपले, तरी नंतर त्यांच्यावरच कोऱ्या कोऱ्या नोटा घेतल्याचा आरोप करून त्यांची बदनामी करण्यात आली. शेतकरी, दिव्यांग आणि सामान्य जनतेसाठी लढणारे आमदार बच्चू कडू यांनाही अपमान, धमक्या आणि अवमानकारक वक्तव्यांना सामोरे जावे लागले. 'पन्नास खोके' पासून ते घरात घुसून मारण्याच्या धमक्यांपर्यंत भाषा वापरण्यात आली. अखेरीस बच्चू कडूंनी दूरदृष्टी ठेवून नवनीत राणा यांची दिल्लीकडे जाणारी राजकीय वाट रोखली.

दलित समाजाचे ज्येष्ठ नेते आनंदराव अडसूळ यांच्याबाबत लोकसभा निवडणुकीत केलेला अपमान आजही विसरला गेलेला नाही. 2024 मध्ये कितीही मनधरणी केली, तरी त्या जखमा भरल्या नाहीत, त्याचा थेट फटका नवनीत राणांना बसला आणि त्यांचा 20 हजार मतांनी पराभव झाला.

काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे हे शांत, संयमी आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. तरीही प्रत्येक सभेत त्यांच्यावर वैयक्तिक पातळीवर टीका करण्यात आली. बौद्ध समाजाला आकर्षित करण्यासाठी किराणा वाटप, फोटोसेशन, बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर लोटांगण घालणे झाले, पण समाजाने हे राजकीय नाट्य ओळखले. त्यामुळे एकवटलेल्या बौद्ध समाजापुढे नवनीत राणा टिकू शकल्या नाहीत. राणा यांच्याकडून आदिवासी समाजाचे माजी आमदार राजकुमार पटेल, माळी समाजाचे नेते छगन भुजबळ, शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांच्या नखाचीही बरोबरी करण्याची क्षमता नसताना त्यांच्यावरही मर्यादा सोडून राणा दाम्पत्याने टीका केली. प्रसिद्धीसाठी कोणालाही लक्ष्य करणे हा त्यांचा स्वभाव बनल्याचे दिसते.

आज महापालिका निवडणुकीतूनच नवनीत राणांच्या राजकारणातील घसरण स्पष्ट दिसू लागली आहे. समाजातील विविध घटकांशी निर्माण झालेली दरी, वारंवार केलेले अपमान, अहंकार आणि अति आत्मविश्वास यामुळेच त्यांच्या 'पापाचा घडा' भरत चालल्याचे चित्र आहे. शिशुपालासारखे शंभर अपराध पूर्ण झाल्यानंतर जसा निर्णय अटळ ठरतो, तशीच वेळ नवनीत राणांच्या बाबतीतही जवळ आली आहे का, असा प्रश्न आता राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.

# भरधाव ट्रकखाली दुचाकी चिरडली

■ एका तरुणांचा मृत्यू, परिसरात हळहळ

■ तपोवनजवळ भीषण अपघात



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 12 ) -** भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. अक्षय प्रविण सोलव (22, रा.कविठा बु., अचलपूर) असे मृताचे नाव आहे. ही घटना सोमवारी सायंकाळी मार्डी रोड स्थित अमरावती विद्यापीठासमोरील रोडवर घडली. या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. मृतक हा मेडिकलमध्ये काम करीत असून, तो तपोवनकडून अमरावतीच्या दिशेने येत होता. दरम्यान हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक एमएच 27 बीएक्स 7052 याने दुचाकी क्रमांक एमएच 27 सीडी 0381 ला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकी थेट ट्रकखाली चिरडली गेली. या अपघातात दुचाकीवरील तरुण अक्षय सोलव हा गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. जखमी तरुणाला त्वरित जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती अक्षयला मृत घोषित केले. अपघात नेमका कशामुळे झाला, ट्रकचालकाचा वेग किती होता, तसेच निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे मृत तरुणांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# चांदूर बाजारात प्रशासन विरोधात शेतकऱ्यांचा उद्रेक

## तहसील कार्यालयाला घेराव, 'कटपुतली आंदोलन'



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.12 )-** अन्नदात्याच्या संयमाचा बांध अखेर तुटला. अतिवृष्टी, नापिकी, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा फास आणि शासनाच्या उदासीन धोरणांविरोधात सोमवारी चांदूर बाजार तहसील कार्यालय परिसर रणांगणात बदलला. प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाला घेराव घालत प्रशासनाविरोधात 'कटपुतली आंदोलन' करून तीव्र निषेध नोंदविला.

'निसर्गाने पिके उद्ध्वस्त केली, पण शासनाने तरी माणुसकी दाखवायला हवी होती,' असा संतप्त सूर आंदोलनस्थळी उमटत होता. केवायसी करूनही अतिवृष्टीची मदत खात्यात जमा न झाल्याने शेतकरी आक्रमक झाले. बँका व सरकारी कार्यालयांतील टोलवाटोलवीवरून 'फाईल हरवते, पण आमचं आयुष्य हरवतंय,' असा घणाघात आंदोलकांनी केला.

पीकविमा योजनेवरही शेतकऱ्यांनी जोरदार हल्लाबोल केला. हप्ते वेळेवर वसूल करणाऱ्या विमा कंपन्या नुकसान होताच गायब होतात, त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांची उघड फसवणूक असल्याचा आरोप करण्यात आला. तूर व हरभऱ्याची शासकीय खरेदी केंद्रे अद्याप सुरू न झाल्याने दलालांचे फावत असून शेतकऱ्यांची लूट होत असल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला.

1 जानेवारी 2026 पासून कृषीपंपांना रात्री वीज देण्याच्या निर्णयालाही तीव्र विरोध झाला. थंडी, अंधार, साप-विंचू, जंगली प्राणी व अपघातांचा धोका असताना शेतकऱ्यांना रात्रभर शेतात उभे ठेवणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण असल्याचे आंदोलकांनी सांगितले. 'अधिकाऱ्यांसाठी एसी कार्यालये आणि शेतकऱ्यांसाठी अंधार?' असा सवालही उपस्थित करण्यात आला.

या आंदोलनात ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विधवा-निराधार लाभार्थी तसेच बांधकाम कामगार सहभागी झाले. संजय गांधी व श्रावणबाळ योजनांचे अनुदान केवायसी करूनही मिळत नसल्याचा रोष व्यक्त झाला. 50 टक्के ग्रामपंचायत करमाफीमुळे गावांचा विकास ठप्प होत असल्याने शासनाने होणारा महसूल तोटा भरून काढावा, अशी मागणी करण्यात आली.

अखेर तहसीलदारांना सर्व मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास जिल्हाभर आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. 'शेतकरी गुलाम नाही, तो जगाचा पोशिंदा आहे. आता शांत राहणार नाही,' असा ठाम इशारा प्रशासनाला देण्यात आला.

# हिरुळकर ज्वेलर्सवर धाडसी चोरी, 66 लाखांचा ऐवज लंपास

## शहरात खळबळ; स्वर्ण व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.12 )-** दर्यापूर शहरातील बसस्थानकासमोरील व्यावसायिक गणोरकर मार्केटलाईनमधील हिरुळकर ज्वेलर्स येथे अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना सोमवारी (दि. 12) सकाळी उघडकीस आली. या घटनेत चोरट्यांनी मौल्यवान सोने-चांदीचे दागिने व मोठ्या प्रमाणात रोकड लंपास केल्याने शहरात एकच खळबळ उडाली असून स्वर्ण व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री दुकान बंद करून रविवारी सुटी असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी दुकानाच्या मागील बाजूचे लोखंडी शटर, दोन चॅनल गेट आणि आतील लाकडी दरवाजाचे कोंडे तोडून आत प्रवेश केला. दुकानातील लोखंडी पेटी व काचेच्या कपाटांमधील विक्रीसाठी ठेवलेले दागिने आणि रोकड त्यांनी चोरून नेली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये चेहरा झाकलेले दोन चोरटे दुकानात वावरताना स्पष्ट दिसत आहेत.

### असा आहे चोरीच्या मालाचा तपशील

**सोने :** 250 ग्रॅम

**चांदी :** सुमारे 32 किलो

**रोकड :** 2 लाख रुपये

**एकूण किंमत :** सुमारे 66 लाख 52 हजार 500 रुपये

या चोरीप्रकरणी सचिन उत्तमराव हिरुळकर यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांनी भेट देऊन तपासास मार्गदर्शन केले. श्वानपथक, ठसेतज्ज्ञ व फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने तपास सुरू असून स्थानिक गुन्हे शाखेची तीन व दर्यापूर पोलीस ठाण्याची दोन पथके शोधकार्य करीत आहेत. पुढील तपास ठाणेदार सुनील वानखडे करीत आहेत.

दरम्यान, हिरुळकर ज्वेलर्सलगतच्या बंद रसवंती दुकानालाही चोरट्यांनी फोडून आत प्रवेश केला असून तेथील साहित्य अस्ताव्यस्त करण्यात आले आहे व दोन मिक्सर चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले आहे.

## डॉक्टरांच्या घरातून 2 लाख लंपास

**अमरावती -** मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपरी गावात अज्ञात चोराने घरफोडी करून कपाटातील 2 लाख 17 हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पिंपरी येथील रहिवासी डॉ. नंदकिशोर हेमराज पवार (वय 39) यांनी दिलेल्या तक्रारीवरून रविवारी मोर्शी पोलिसांनी संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चोरीची घटना नेमकी कशी घडली, याचा तपास मोर्शी पोलीस करीत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

## बसस्थानक परिसरात दुचाकीस्वारावर हल्ला

**अमरावती -** शिरखेड पोलीस ठाणे हद्दीतील राजुरवाडी येथील रहिवासी ऋषिकेश तुलसीदास कंठाळे (35) यांच्यावर रविवारी सायंकाळी हल्ला झाल्याची घटना घडली. बसस्थानक परिसरातून मोटारसायकलवरून बाहेर पडत असताना कारमधून आलेल्या अक्षय मोहोकर आणि कुलदीप अंभोरे यांनी त्यांची दुचाकी अडवून मारहाण केली.

# हिंदू म्हणून जागृत होऊन मतदान करा - राणे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 12 ) -** अमरावती महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार अधिक तीव्र होत असून, मोरबाग प्रभागात आयोजित सभेत भाजपचे फायरब्रँड नेते व मंत्री नितेश राणे यांनी आक्रमक शैलीत भाषण केले. ही निवडणूक आपसातील भांडणाची नसून देशभक्त शक्तींमागे उभे राहण्याची आहे, असे सांगत त्यांनी 3 तारखेला मतदान करताना हिंदू म्हणून जागृत राहण्याचे आवाहन केले. राणे यांनी एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी यांच्यावर टीका करत, विकासाच्या मुद्द्यांऐवजी धमकीची भाषा केली जात असल्याचा आरोप केला. अमरावतीत मुस्लीम महापौर बसवण्याचे दावे समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणारे असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणुकीनंतर सण-उत्सव व धार्मिक प्रथांवर मर्यादा येतील, अशी भीती पसरवली जात असल्याचा दावाही त्यांनी केला. वक्फ कायदा आणि जमिनींच्या मालकीबाबत बोलताना त्यांनी कागदपत्रांची गरज अधोरेखित केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात वक्फ कायद्यात झालेले बदल हिंदू समाजाच्या जमिनी सुरक्षित करण्यासाठी महत्त्वाचे असल्याचा दावा त्यांनी केला.



भाषणात 'लव्ह जिहाद'चा मुद्दा उपस्थित करत खोटी नावे सांगून फसवणूक व धर्मांतराचा दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ना खान, ना बाण, ना पाणा, फक्त भाजपचे कमळ, असे म्हणत राणे यांनी भाजपलाच मत देण्याचे थेट आवाहन केले. लोकशाहीत मतदानाची ताकद योग्य ठिकाणी वापरण्याचे त्यांनी नागरिकांना आवर्जून सांगितले.

# आज शांत होणार महापालिका निवडणुकीचे प्रचार ढोल

## प्रचारानंतर आचारसंहिता भंग करणाऱ्यांवर गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) - महानगरपालिकेच्या सातव्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरू असलेला प्रचार कालावधी आज मंगळवारी सायंकाळी ठीक 5.30 वाजता अधिकृतरीत्या संपणार आहे. या वेळेनंतर शहरात कोणत्याही स्वरूपाचा प्रचार, बॅनर, पोस्टर, भित्तीपत्रके, ध्वनिक्षेपक अथवा सभा आढळल्यास संबंधितांवर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा मुख्य निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांनी दिला आहे.**



राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदानाच्या 48 तास आधी प्रचार पूर्णपणे थांबविणे बंधनकारक आहे. त्यानुसार आज सायंकाळी 5.30 वाजताच प्रचाराचा आवाज कायमचा बंद होणार आहे. या वेळेनंतर शहरातील सर्व प्रमुख रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती व खासगी मालमत्तांवर लावलेले प्रचार साहित्य तातडीने हटविण्यात येणार आहे. मनपा प्रशासनामार्फत यासाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, कारवाईचे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा यांनी स्पष्ट केले की, मतदान प्रक्रिया शांततापूर्ण, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी प्रशासन आणि पोलीस यंत्रणा पूर्णत: सज्ज आहेत. कोणताही अनुचित प्रकार, अफवा, गोंधळ किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शहरभर कडक नजर ठेवण्यात येणार आहे. मतदान गुरुवार, दि. 15 जानेवारी रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत पार पडणार आहे. नागरिकांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### 805 मतदान केंद्रांवर मतदान

निवडणूक निर्णय अधिकारी सौम्या शर्मा यांच्या माहितीनुसार, शहरात एकूण 805 मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी सुमारे 3,600 कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी 805 नियंत्रण युनिट्स तसेच 3,320 मतपत्रिका तयार ठेवण्यात आल्या आहेत.

### पोलीस प्रशासन पूर्ण सतर्क

निवडणूक प्रक्रियेसाठी पोलीस प्रशासन आणि महानगरपालिका समन्वयाने काम करत असून, शहरात कडक सुरक्षा व्यवस्था उभी करण्यात आली आहे. अमरावती ग्रामीण व यवतमाळ जिल्ह्यातून सुमारे 900 होमगार्ड, एसआरपीएफची एक पलटण, दोन प्रोबेशनरी डीवायएसपी आणि दोन डीवायएसपी तैनात करण्यात आले आहेत. शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत 3 डीसीपी, 31 पीआय, 120 एपीआय व पीएसआय तसेच सुमारे 1,800 पुरुष व महिला पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी कार्यरत राहणार आहेत. मतदानपूर्व तयारीपासून ते मतदानाच्या दिवशी आणि मतमोजणी पूर्ण होईपर्यंत हे सर्व अधिकारी व कर्मचारी सतर्क कर्तव्यावर राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शिक्षक मतदार संघाची अंतिम मतदार यादी जाहीर

## विभागात 33 हजारांहून अधिक मतदार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 12 )-** शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी सुरू असलेल्या प्रदीर्घ आणि बारकाईच्या प्रक्रियेनंतर अखेर विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी सोमवारी अंतिम मतदार यादी जाहीर केली. व्यापक तपासणी, दावे-हरकती आणि तक्रारींच्या छाननीनंतर तयार झालेल्या या यादीत विभागातील पाच जिल्ह्यांमधील एकूण 33 हजार 9 शिक्षक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मात्र, निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्जांच्या अंतिम तारखेपर्यंत मतदार नोंदणी सुरू राहणार असल्याने ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.



सोमवारी (12 डिसेंबर) जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीत अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये अमरावती विभागीय मुख्यालयात सर्वाधिक 9,110 मतदार असून, वाशिम जिल्ह्यात सर्वात कमी 3,471 मतदार आहेत. मतदारसंख्येच्या बाबतीत बुलढाणा जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर असून, तेथे एकूण 8,577 शिक्षक मतदार आहेत. त्याखालोखाल यवतमाळ जिल्ह्यात 6,472, तर अकोला जिल्ह्यात 5,379 मतदार नोंदणीकृत आहेत.

### 3,917 हरकती; 724 नावे वगळली

मतदार यादी अंतिम करण्यापूर्वी प्रशासनाला एकूण 3 हजार 917 हरकती प्राप्त झाल्या होत्या. या सर्व हरकतींचे सखोल निराकरण केल्यानंतर 724 आक्षेपार्ह मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली, तर 3 हजार 193 नवीन पात्र मतदारांची नोंद करण्यात आली आहे.

### बनावट नोंदणीप्रकरणी 2 एफआयआर

दरम्यान, मतदार नोंदणी प्रक्रियेदरम्यान बनावट नोंदणी केल्याच्या आरोपावरून विभागात 2 एफआयआर दाखल करण्यात आल्या आहेत. या दोन्ही एफआयआर अमरावती जिल्ह्यातील वरुड पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

RNINO-46975/1985 Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
**Group Editor-in-Chief and Managing Director**- Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**

# दंत रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचे कामबंद आंदोलन

## तीन महिन्यांपासून विद्यावेतन रखडले : रुग्णसेवा कोलमडली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
उपराजधानीतील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील (दंत) निवासी डॉक्टरांचे विद्यावेतन मागील तीन महिन्यांपासून रखडले आहे. वारंवार विनंती केल्यावरही ते मिळत नसल्याने संतप्त निवासी डॉक्टरांनी आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोमवारी अचानक कामबंद आंदोलन सुरू केले.

त्यामुळे येथील रुग्णसेवा कोलमडली. अचानक निवासी डॉक्टर संपावर गेल्याचे बघत वरिष्ठ अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. बाह्यरुग्ण विभागात डॉक्टरांचा तुटवडा असल्याने रुग्णांना ताटकळत रहावे लागले.

दंतमधील निवासी डॉक्टरांच्या संयमाचा बांध सोमवारी फुटला. मागील तीन महिन्यांपासून हक्काचे विद्यावेतन न मिळाल्याने संतप्त झालेल्या जवळपास ७२ निवासी डॉक्टरांनी सोमवारी अचानक कामबंद आंदोलन पुकारले. ऐन परीक्षेच्या आणि अभ्यासाच्या काळात खिशात पैसे नसल्याने या डॉक्टरांवर उपासमारीची वेळ आली असून, त्यांनी कामबंद केल्याने येथील रुग्णसेवा वाऱ्यावर असल्याचे धक्कादायक चित्र होते.

दंतमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे (पीजी) तीन वर्षांचे एकूण ७२ निवासी डॉक्टर कार्यरत आहेत. एका निवासी डॉक्टरला दरमहा सुमारे ७० हजार रुपये विद्यावेतन मिळते. याच रकमेतून त्यांना आपला दैनंदिन खर्च, मेसचे बिल आणि महागड्या वैद्यकीय साहित्याचा खर्च करावा लागतो. मात्र, आक्टोबर महिन्यापासून हे विद्यावेतन रखडले आहे.

दरम्यान निवासी डॉक्टरांनी वारंवार विनंत्या करूनही केवळ आश्वासने मिळत आहेत. घरून पैसे मागवायचे किती दिवस? प्रशासनाला आमच्या पोटापाण्याची काळजी नाही का? असा संतप्त सवाल काही डॉक्टरांनी उपस्थित केला. संतप्त निवासी डॉक्टर सकाळपासून अधिष्ठाता कक्षाच्या मागील ओपन सभागृहात ठिय्या मांडून बसले होते.

काही डॉक्टरांना या बाबत विचारले असता, त्यांनी आक्टोबरपासून विद्यावेतन मिळाले नसल्याचे सांगितले. मात्र, काही डॉक्टरांनी आज प्रश्न सुटेल, असे आश्वासन अधिष्ठाता डॉ. फडणाईक यांनी दिल्याचा दावा केला. मात्र, ते संपावर असल्याचे सांगायला तयार नव्हते. यावरून हे विद्यार्थी कोणाला घाबरत आहे का, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. मात्र, आठवड्याचा पहिला दिवस रुग्णांची गर्दी असताना निवासी डॉक्टर मदतीला नसल्याने रुग्णांचे हाल झाले.



### विद्यावेतनासाठी पाठपुरावा

विद्यावेतनासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे (डीएमईआर) नियमित पाठपुरावा सुरू आहे. या संदभार्तील प्रस्ताव आधीच पाठवण्यात आला. महापालिकेची निवडणूक असल्याने व वैद्यकीय शिक्षण खात्यातील कर्मचाऱ्यांच्याही सेवा तेथे लागल्याने विद्यावेतन सही अभावी लांबण्याची शक्यता आहे. परंतु, आज निवासी डॉक्टर संपावर गेल्याने सहसंचालक डॉ. राज गजभिये यांची भेट घेतली. त्यांनी आश्वासन दिल्यामुळे लवकरच निवासी डॉक्टरांच्या खात्यात विद्यावेतन जमा होण्याची शक्यता आहे, अशी माहिती शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मंगेश फडनाईक यांनी सांगितले.

# त्यामुळेच आयोगाला काहीसा वेळ...

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
महापालिकानंतर राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांबाबत उत्सुकता होती.



परंतु निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणुकांसाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी केली होती. अखेर, सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषद निवडणुकांसाठी दोन आठवड्यांची मुदतवाढ मंजूर केली. यावर आज महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टच सांगितले. फेब्रुवारीत दहावी-बारावीच्या परीक्षा, नुकत्याच पार पडलेल्या निवडणुका, बजेट सत्र आणि निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन यामुळे आयोगाला काहीसा वेळ लागत असावा, असे बावनकुळे यांनी सांगितले.

बावनकुळे यांनी सोमवारी नागपुरात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. ओबीसी आरक्षणाचा तिढा हा विषय असून सरकारची बाजू न्यायालयात मांडली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे, आता राज्य निवडणूक आयोगाला १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणुका घ्याव्या लागणार आहे.

लाडकी बहीण योजनेवर निवडणूक आयोगाच्या आक्षेपांबाबत ते म्हणाले की, ही योजना आजची नाही; नियमितपणे सुरू असलेली योजना असल्याने आचारसंहितेचा भंग होत नाही. त्यामुळे निवडणूक आयोग ही योजना बंद करणार नाही.

भाजपच्या प्रचाराबाबत ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळातील योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यात आल्या आहेत. निवडून आलेल्या प्रतिनिधींसाठी विकास आराखडा तयार असून विदर्भात सर्वत्र भाजपला यश मिळेल, तर काँग्रेसची ताकद कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**टीकेचा भडीमार**

राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, भावनिक पद्धतीने बोलून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. विकासाचा अजेंडा बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला जात असून राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या प्रचाराची दिशा आणि फोकस चुकत आहे.

# मातृतीर्थ सिंदखेड राजात उसळला जनसागर

## राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :
राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा ४२८ वा जन्मोत्सव सोहळा सोमवारी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत दर्शनासाठी बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातील जिजाऊ व शिवभक्तांचा सकाळपासूनच जनसागर लोटला .

सकाळी ६ वाजता राजे लखुजीराव जाधव राजवाड्यातील राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानी वंशज राजे शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. तसेच केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक राजमाता माँ जिजाऊ यांची महापूजा करुन अभिवादन केले.

यावेळी सिंदखेड राजाचे आमदार मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनीही राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सोमवारी सिंदखेड राजा येथील लखुजाराव जाधव राजवाड्यातील जिजाऊ जन्मस्थळी भेट देवून अभिवादन केले. यावेळी त्यांनी जिजाऊ सृष्टीस भेट दिली.

यावेळी उपविभागीय अधिकारी संजय खडसे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी आदित्य सिंग, तहसीलदार अजित दिवटे, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, राज्य संघटक मनोहर तुपकर, जिल्हाध्यक्ष रविंद्र चेके, व्यवस्थापक सुभाष कोल्हे उपस्थित होते.

राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेबांना अभिवादन करुन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, देशभरातून जिजाऊभक्त, शिवप्रेमी जिजाऊ यांच्या जन्मस्थानी येतात. हे मातृतिर्थ सिंदखेड राजा भूमीचे वैभव आहे. त्यांच्या दर्शनाने अनेकांना नवी प्रेरणा मिळते. राज्य शासनाने सिंदखेड विकास आराखडा जाहीर केला आहे. यातील कामे वेगवेगळ्या विभांगांकडे दिलेली आहेत.

# बलात्कार प्रकरणांतील आरोपींची भाजपाकडून पाठराखण?

## काँग्रेसचे प्रदेश मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
महिलांचे शोषण आणि बलात्कार प्रकरणांतील आरोपींच्या पाठीशी उभे राहणाऱ्या भाजपने काँग्रेसला महिला विरोधी ठरवणे हास्यास्पद असल्याची टीका काँग्रेसचे प्रदेश मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली. भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या वक्तव्याचा समाचार घेत त्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला.

भाजपने महापालिका निवडणुकीसाठी जाहीरनामा जाहीर केला असला तरी शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देणे टाळले आणि तेथून निघून गेले. आज काँग्रेसला महिला विरोधी ठरवले जात आहे, मात्र वास्तवात भाजपची भूमिका महिलाविरोधी आहे. शांतीच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या सोनम वांगचूक यांना तुरुंगात डांबले जाते, तर कुलदीप सिंह सेंगरसारख्या बलात्कार प्रकरणातील आरोपींना जामीन दिला जातो, असा




आरोप लोढे यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, ब्रृजभूषण सिंह यांच्यावर हजारो महिला खेळाडूंच्या शोषणाचे आरोप झाले असताना भाजपने त्यांच्याच पाठीशी उभे राहून त्यांच्या मुलाला खासदारकीची उमेदवारी दिली. ही भाजपची महिलांबाबतची भूमिका स्पष्ट करणारी बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माहिती असतानाही कर्नाटकातील प्रज्वल रेवण्णा यांनी १५ ते ६८ वयोगटातील सुमारे तीन हजार महिलांचे शोषण केल्याचे आरोप असताना त्यांच्या प्रचारासाठी पंतप्रधानांनी सभा घेतली आणि प्रज्वलला मत म्हणजे मोदींना मत असे आवाहन केले. हीच भाजपची महिलाविरोधी विचारसरणी असल्याचे लोंढे यांनी नमूद केले.

राज्यातील महिलांची अवस्था अत्यंत दयनीय असून राजीव गांधी निराधार योजनेतील लाभार्थी महिलांना गेल्या आठ महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. श्रावण बाळ योजनेसाठीचा निधीही आलेला नाही. महिला उपाशी आहेत, व्याकुळ आहेत, मात्र भाजप सरकारला त्याचे काही देणेघेणे नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

काँग्रेस सत्तेत आल्यास महिलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी शहर बस सेवा मोफत केली जाईल. याशिवाय मालमत्ता कर आणि पाणीपुरवठा निशुल्क देण्याचा निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.




लोकारोग्य

आपल्या अवतीभवती असंख्य असे जिवाणू आणि विषाणू मुक्तपणे वावरत असतात. अर्थात आपली रोगप्रतिकारक शक्ती जर चांगली असेल तर या जिवाणू किंवा विषाणू पासून आपल्याला धोका नसतो. परंतु अनेकदा याच जिवाणू आणि विषाणूंचा आपल्या शरीरात प्रवेश झाला कि आपल्याला विविध आजार उद्भवतात. गालगुंड हा असाच एक विषाणूजन्य आजार आहे. आपला एक किंवा अनेकदा दोन्ही गाल अचानक फुग्यासारखे टम्म फुगतात आणि आपल्याला बोलताना आणि जेवताना देखील त्रास होतो. हा गालगुंड आजार नेमका कशामुळे होतो? गालगुंड आजाराची कारण आणि लक्षण काय असतात? आणि ज्यांना गालगुंड झाला असेल त्यांनी कोणते उपचार करावेत?या प्रश्नाची उकल करण्यासाठी त्वचाविकार तज्ज्ञ डॉ. मोहिनी केळकर यांच्याशी संवाद.

**गालगुंड म्हणजे काय?**

■ गालगुंड हा एक संसर्गजन्य आणि विषाणूजन्य आजार आहे. गालगुंड झालेल्या व्यक्तीचे गाल सुजतात,त्यांना ताप येतो. तसेच तोंडाच्या आतील लाळ ग्रंथींना सूज येते. गालगुंड झालेल्या व्यक्तीला शरीराच्या इतर भागामध्ये देखील जळजळ होऊ शकते. आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी असेल तर अशा प्रकारे गालगुंड आजार लहान मुलांना आणि प्रौढ व्यक्तीला देखील होऊ शकतो.

**गालगुंड आजाराची कारण काय आहेत?**

■ गालगुंड हा एक विषाणूजन्य आणि संसर्गजन्य आजार असल्यामुळे तो एका व्यक्तीकडून दुसरीकडे सहज पसरतो. गालगुंड झालेल्या व्यक्तीने हवेत श्वास घेतला तरी हे विषाणू हवेद्वारे दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात जातात. अशी व्यक्ती शिंकली किंवा खोकली तरी हे विषाणू संक्रमित होतात. गालगुंड झालेल्या व्यक्तीच्या लाळेशी संबंध आला तरी हा आजार पसरतो. रक्त तपासणी,मूत्र तपासणी आणि घशातील स्वाब द्वारे या आजाराचे निदान होते.

**गालगुंड आजाराची लक्षणे काय असतात?**

■ संक्रमित व्यक्तीशी संबंध आला कि साधारण एका आठवड्यात गालगुंडाची लक्षण दिसू लागतात. सुरवातीला हलकासा ताप येतो. त्यानंतर दोखेदुखी प्रचंड थकवा जाणवतो. अंगदुखी आणि भूक न लागणे हि देखील या आजाराची लक्षण दिसतात. आपले गाल पुरी सारखे टम्म फुगतात आणि वारंवार दुखतात देखील. प्रौढ पुरुषांमध्ये अंडकोशाला जळजळ होऊ शकते.

**गालगुंड आजरावर कोणते उपचार आहेत?**

■ गालगुंड आजारावर कोणतेही विशिष्ट उपचार उपलब्ध नाहीत. मात्र प्रतिबंधात्मक स्वरूपाचे उपचार आपण घरच्या घरी करून या आजाराला प्रतिबंध करू शकतो. यासाठी भरपूर विश्रांती घ्यायची. वेदना कमी करण्यासाठी पॅरासिटामोल किंवा आयबुप्रोफेन सारखी औषध घेऊ शकतो.

भरपूर प्रमाणात पाणी आणि इतर द्रवपदार्थ प्या. चेहऱ्यावरील वेदना आणि सूज कमी करण्यासाठी उबदार किंवा थंड कॉम्प्रेस वापरू शकतो. सूप किंवा अंडी या सारखे जास्त चघळणारे पदार्थ टाळा. गालगुंड आजारावर लस देखील आता उपलब्ध आहे. ○ ○

## ओळख वैद्यक यंत्रांची स्टेथोस्कोप



स्टेथोस्कोप हे डॉक्टरांचे एक महत्त्वाचे उपकरण आहे, ज्याचा उपयोग शरीरातील अंतर्गत आवाज जसे की हृदयाचे ठोके, फुफ्फुसांचे आवाज आणि आतड्यांची हालचाल ऐकण्यासाठी होतो, ज्यामुळे रोगाचे निदान करणे सोपे होते.

याला मराठीत वक्षश्रवणयंत्र असेही म्हणतात आणि रक्तदाब तपासण्यासाठीही याचा वापर केला जातो. यात एक डायफ्राम (मोठा भाग) आणि बेल (लहान भाग) असतो, जे आवाजाचे ध्वनी लहरींमध्ये रूपांतर करून ट्यूबिंगद्वारे कानांपर्यंत पोहोचवतात. स्टेथोस्कोपचे मुख्य भाग म्हणजे चेस्टपीस यात डायफ्राम आणि बेल असते. डायफ्राम उच्च-फ्रिक्वेन्सीचे आवाज (जसे की फुफ्फुसे) ऐकतो, तर बेल कमी-फ्रिक्वेन्सीचे आवाज (जसे की हृदय) ऐकते.

ट्यूबिंग ही रबरची नळी आवाजाला चेस्टपीसपासून कानांपर्यंत पोहोचवते.तर इअरपीस हे कानांमध्ये बसतात आणि आवाज स्पष्टपणे ऐकण्यास मदत करतात.स्टेथोस्कोप मुळे हृदयाचे ठोके मोजणे,श्वास घेतानाचा आवाज आणि फुफ्फुसातील असामान्य आवाज ऐकण्यासाठी, शरीरातील आतड्याची हालचाल ऐकण्यासाठी आणि रक्तदाब मोजण्यासाठी देखील होतो. स्टेथोस्कोपचे हे डॉक्टरांना शरीराच्या आत काय चालले आहे, याचा अंदाज घेण्यासाठी मदत करते. यामुळे डॉक्टरांना त्वरित निदान करून योग्य उपचार योजना आखता येते. ■ ■ ■

## इन्फोमेरिक्स व्हॅल्युएशनचा फार्मास्युटिकल्स अहवाल

इन्फोमेरिक्स व्हॅल्युएशन अँड रेटिंग्स लिमिटेडने डॉ. मनोरंजन शर्मा, मुख्य अर्थशास्त्रज्ञ, इन्फोमेरिक्स व्हॅल्युएशन अँड रेटिंग्स लिमिटेड यांच्याद्वारे भारतीय फार्मास्युटिकल्स प्रतिकूल परिस्थिती असूनही पुढे वाटचाल या विषयावर एक दृष्टिकोन अहवाल प्रसिद्ध केला आहे.

हा अहवाल किंमत ट्रेंड, विक्री महसूल, व्यापार, वैद्यकीय उपकरण क्षेत्र, उत्पादन संलग्न प्रोत्साहन नियामक घडामोडी, उद्योग जोखीम आणि पुढील वाटचाल यावर अंतर्दृष्टीपूर्ण दृष्टिकोन प्रदान करतो. अहवालातील प्रमुख मुद्दे म्हणजे, मजबूत देशांतर्गत मागणी, दीर्घकालीन उपचारांमधील वाढ आणि आरोग्यसेवेच्या वाढत्या उपलब्धतेमुळे भारतीय औषध उद्योग लवचिकता दर्शवत आहे.

अमेरिकेच्या जेनेरिक औषधांच्या बाजारातील किमतीचा दबाव आणि नियामक तपासणी यांसारख्या जागतिक प्रतिकूल परिस्थिती असूनही, भारतीय फार्मा कंपन्या उत्पादनाच्या प्रमाणात वाढ आणि उत्पादन विविधीकरणाद्वारे आपली वाढ टिकवून ठेवत आहेत. हृदयविकार, मधुमेहविरोधी, गॅस्ट्रो आणि श्वसन विभागातील उपचारांमुळे देशांतर्गत फॉर्म्युलेशन बाजारपेठ वाढीचा एक प्रमुख चालक म्हणून कायम आहे. निर्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे, आणि भारत जागतिक स्तरावर परवडणारी जेनेरिक औषधे, लसी आणि एपीआय यांचा प्रमुख पुरवठादार म्हणून आपले स्थान कायम ठेवत आहे.

पीएलआय योजनेसारख्या सरकारी उपक्रमांमुळे एपीआय उत्पादनात हळूहळू सुधारणा होत आहे, ज्याचा उद्देश आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि पुरवठा साखळी मजबूत करणे आहे.नवकल्पना, विशेष उत्पादने, जटिल जेनेरिक औषधे आणि बायोसिमिलर्स दीर्घकालीन वाढ आणि नफ्याच्या स्थिरतेमध्ये अधिकाधिक योगदान देत आहेत. एकंदरीत, या क्षेत्राचा दृष्टिकोन सकारात्मक आहे, आणि आरोग्यसेवेची मागणी, धोरणात्मक पाठिंबा आणि वाढत्या जागतिक संधींमुळे मध्यम ते दीर्घ कालावधीत सातत्यपूर्ण वाढ अपेक्षित आहे. ■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेची 'सुवर्ण' भरारी

# सोलार ॲग्रो पॉवर कंपनीला राष्ट्रीय पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
राज्यातील ४५ लाखांवर शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे स्वप्न पुर्णत्वास नेणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडला नवी दिल्ली येथे शनिवारी (दि. १०) स्कोच समूहाच्या वतीने राष्ट्रीय सुवर्ण पुरस्काराने गौरविण्यात आले.

राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड अंतर्गत मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठा गती दिली आहे.

या दोहोंच्या नेतृत्वात गेल्या सव्वा वर्षांत ३३०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प या योजनेतून कार्यान्वित झाले. त्याद्वारे ४० लाख एकर शेतजमिनीवर सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे.

देशाच्या विकासामध्ये योगदान देणाऱ्या विविध सार्वजनिक क्षेत्रातील योजना व संस्थांना दिला जाणारा स्कोच समूहाचा पुरस्कार हा राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र सन्मान आहे. पुरस्कारासाठी ऊर्जा वर्गवारीमध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या कामगिरीचे विविध तज्ज्ञांकडून मूल्यमापन करण्यात आले.

शेतकरी लाभार्थ्यांचे अभिप्राय घेण्यात आले. यासह तज्ज्ञांच्या मतदानाद्वारे देशात प्रथम ठरलेल्या या योजनेला स्कोच सुवर्ण पुरस्कार जाहीर करण्यात आला. एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्रीकांत जलतारे व अधीक्षक अभियंता निखिल मेश्राम यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे.

या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. या योजनेत आतापर्यंत ३३०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे ८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे.

# ट्रकखाली चिरडून दुचाकीस्वार ठार

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १२ :
खड्डा वाचवण्याच्या प्रयत्नात ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. डोणगाव येथे मुंबई - नागपूर राज्य महामार्गावर बस स्थानक परिसरात ही घटना घडली.

सतीश बाबुराव निकाळजे (रा. राऊतवाडी, चिखली) दुचाकीने जात असताना येथील बस स्थानक परिसरातील अयोध्या कापड दुकानासमोर खड्डा चुकवण्याच्या प्रयत्नात मालेगावकडून मेहकरकडे जाणाऱ्या ट्रकच्या ट्रकच्या मागील चाकाखाली आले. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. ट्रकच्या चाकाखाली चिरडल्या गेल्याने मृताचा चेहरा पूर्णपणे विद्रूप झाला होता.

